श्री. वसंत नामे, सौ. शुभदा नामे
पार्ले येथील सुप्रसिद्ध
पार्लेश्वर वडापाव सम्राट
स्वादिष्ट वडापाव

दादर (प)येथे (सुविधाशेजारी)
समारंभासाठी बटाटावडा व समोसाच्या ऑर्डर्स स्वीकारण्यात येतील.
मराठा भुवन (सुभाष रोड), भोमले चौक (नेहरु रोड), विलेपार्ले आणि मालाड (पूर्व) येथेही
9324047619, 9819943106


॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥
ब्राह्मण सेवा मंडळ प्रकाशित

# स्वयम्

ब्राह्मण सेवा
मार्च २०१५
वर्ष १ • अंक ४










- Deepak Chheda -
98694 70817
98213 30817
Chheda Modak
Estate Consultant
Vile Parle/ Andheri/ Santacruz/ Goregaon
Contact for : sale-Purchase & Leave Licence of Flats, Shops, Office and RE-DEVELOPMENT PROJECTS
Shop No.3, Sidhachal Building,
Hanuman Road, Vile Parle (E.),
Near Cosmos Bank,
Mumbai- 400 057.
Tel.: 022-26184268/ 69, 26136954
email: chhedamodak@yahoo.com

सौ. मीनल वसमतकर

# बहिणाई



प्रतिभा हे कवी लेखकाला निसर्गाचं देणं आहे. ते त्याच्या बरोबरच यावे लागते. कोकीळेने तोंड उघडले की ती आपोआप गाऊ लागते. प्राजक्ताची कळी उमलली की ती चौफेर सुगंधाने आजुबाजूचे वातावरण भरून टाकते. तसेच जातीवंत कवीचे आहे. त्यांचे ध्येयच ताल धरून बसलेले असते. त्यामुळे त्यांच्या जिभेवर शब्द जो येतो तोच मुळी नाचत. सृष्टीतले सौंदर्य तेवढे त्यांच्या डोळ्याला दिसते. जीवनातले संगीत त्याला ऐकू येते. डोंगराच्या कपारीआडून जसा एखादा झरा खळखळत खाली येतो, तसे काव्य त्यांच्या हृदयाकडून उसळ्या घेत असते.

बहिणाई ह्यांनी तर कधी शाळेत पाऊलही ठेवले नव्हते. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. ''विठोबाचे अन् रामाचे मंदिर ह्याच माझ्या शाळा'' असे त्या म्हणत. रोजचे घरातले व शेतातले काम करत करत त्यांनी गाणी रचली आणि त्यातली थोडी कुणीतरी टिपून ठेवली. पुष्कळशी त्यांच्या बरोबर लोप पावली. काही गीते त्यांचे चिरंजीव सोपान चौधरी यांनी लिहून आचार्य अत्रे यांना दाखवली आणि पुस्तक रूपाने जगासमोर ती गीतं आली. जात्यावर दळता दळता किंवा चूल फुंकता फुंकता...

**माय भीमाई माऊली,**
**जशी आंब्याची सावली**

बहिणाईचं किंवा लोक साहित्य मनाला भिडणारं आहे. बहिणाईची प्रतिभा निराळी. धरतीच्या कुशीत बी पेरल्या नंतर त्यांना वाटतं की हे केवळ पेरणं नव्हे तर त्या म्हणतात...



**ऊन वाऱ्याशी खेयत**
**एक एक कोंबातून**
**पर्गटले दोन पानं**
**जसे हात जोडीसन**
**टाळ्या वाजवित पानं**
**दंग देवाच्या भजनी**

अशी कल्पनेची भरारी त्यांच्या मनाने मारली आहे. बघ उन वाऱ्या सोबत तग धरून बी रुजते आणि मग हळूच दोन पानं वर डोकं काढतात. तर या दोन पानांना पाहून बहिणाई वाटते की ते हात जोडतात. नुसते हात जोडतात असे नाही तर ते जेव्हा वाऱ्यावर फडफड करून एकमेकांवर आढळतात त्यांना ते टाळ्या वाजवून देवाच्या भजनात दंग असल्याचा भास त्यांना होतो.

**लपे करमाची रेखा**
**माझ्या कुंकवाच्या खाली**
**पुसोनिया गेले कुंकू**
**रेखा उघडी पडली**

असे वैधव्याचे हृदयभेदक करूण काव्य जिच्या मुखातून प्रकट होते तिचे कवित्व सामान्य आहे, असे कोण म्हणेल? सकाळी उठून बहिणाई घरोट्यावर म्हणजे जात्यावर बसून दळू लागल्या की जात्यातून तिकडे पीठी पडू लागायची आणि इकडे बहिणाईच्या ओठातून काव्य सांडू लागे.

**अरे घरोट्या घरोट्या**
**तुझ्यातून पडे पिठी**
**तसं तसं माझं गाणं**
**पोटातून येतं व्होटी**

म्हणजे ते दळण कांडण असो की चूल पेटवणं असो, त्यांना गाणं सुचायचं. याला म्हणतात 'जातीवंत' हाडाचा कवी. चूल जेव्हा पेटत नाही तेव्हा त्या म्हणतात जरा रागानेच,



**पेट पेट धूक कायेला**
**किती घेसी माझा जीव**
**अरे इस्तवाच्या धन्या**
**कसं आलं तुले हीव**

बहिणाई रानात जाता जाता त्यांना फळांनी डवरलेले हिरवं वडाचे झाड दिसले की, लागलीच त्यांच्या जीभेवर शब्द नाचत....



**हिरवी हिरवी पान**
**लाल फळ जशी चोच**
**आले वडाच्या झाडाला**
**जसं पीक पोपटाचं**

किंवा कडूलिंबाच्या झाडावर पिवळ्या निंबोळ्या पाहून त्यांना काव्य सुचे...

**कडू बोलता बोलता**
**पुढे कशी नरमली**
**कडू निंबोणी शेवटी**
**पिकीसनी गोड झाली**

शेतामध्ये कापणी मळणी चालू आहे. मळणी चालू असताना बैल गरगर फिरत, त्याला त्या मायेनं चोंबाळत आणि लगेच म्हणत....



**पय उचल रे बैला**
**कर बाप्पा आता घाई**
**चालू दे रे रगडन**
**तुझ्या पायाची पुण्याई**

किंवा धान्य साफ करायला वाऱ्याने उशीर केला की त्या म्हणत, त्या हाक मारीत....

**चाल ये रे ये रे वाऱ्या**
**ये रे मारोतीच्या बापा**
**नको देऊ रे गुंगारा**
**पुऱ्या झाल्या तुझ्या थापा**

शेतात कष्ट करत असताना शेतकरी कर्जबाजारी होतो. त्यामुळे त्याला विठ्ठल भक्ती करणे सुध्दा कठीण होते. याचाही अनुभव त्यांना होता. त्या म्हणतात....

**अरे पांडुरंगा तुझी**
**कशी भक्ती करू सांग**
**तुझ्या रुपाआड येत**
**सावकाराचं रं सोंग**

शेतकऱ्याच्या मनाचे गुपित यातून बहीणाईने व्यक्त केले आहे. महाराष्ट्रातील भोळ्या भाबड्या शेतकऱ्याचे दु:ख कष्टाळू आणि तरीही समाधानी. शेतकऱ्याच्या संसाराचे काव्य त्यांनी आपल्या शब्दात बंध केले आहे.

मराठी वाङ्मयात अमर होतील अशी अनेक सुभाषिते जागोजाग त्यांच्या काव्यात विखुरलेली आढळतात.



**विना कपाशीनं उले**
**त्याला बोंडं म्हणू नही**
**हरी नामाई न बोले**
**त्याला तोंड म्हणू नही**

*(उर्वरित मुखपृष्ठ ३ वर→)*

## “तर सांगायचं म्हणजे..”

नमस्कार मंडळी,

२०१४-१५ या आर्थिक वर्षातील शेवटचा महिना. व्यावसायिक, नोकरदार सर्वच आपापल्या आर्थिक ताळेबंदाचा मेळ घालण्यात व्यग्र असणार. त्याचबरोबर हवेतील उष्माही वाढू लागलाय. वर्तमानपत्रात आणि दूरदर्शनवर वैद्यकीय सदरांत अशा हवामानात काय काळजी घ्यावी याच्या सूचनाही वाचनात येऊ लागल्या आहेत. तेव्हा मंडळी, सर्वांनीच तब्येतीची काळजी घ्या.

आणखी एका कारणाने अनेक घरात सध्या तणावाचे वातावरण असेल. हे कारण कोणते? ‘परीक्षा’ नावाच्या बागुलबुवाची भिती. दहावी-बारावी च्या बोर्डाच्या परीक्षा. मंडळाची अभ्यासिकाही आता विद्यार्थ्यांनी तुडुंब भरू लागली आहे. नजिकच्या काळात सुरू होणाऱ्या शाळांच्या तसेच महाविद्यालयातील परीक्षा. तर बच्चे कंपनी, मुळीच भिऊ नका. सगळ्यांनी वर्षभर नियमित अभ्यास केलाय आणि म्हणूनच सर्वांना भरघोस यश मिळणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना खूप खूप शुभेच्छा!

मागील तीन अंकात मंडळाच्या वेगवेगळ्या उपक्रमांची माहिती आपल्यापर्यंत छायाचित्रांच्या माध्यमातून पोहोचवली. त्याच अनुषंगाने, आपणास अतिशय आनंदाने व अभिमानाने सांगू इच्छिते, १२ फेब्रुवारी २०१५ रोजी ‘आनंदाश्रमाचा’ १० वा वर्धापनदिन साजरा झाला. श्री. शेखर चक्रदेव व सौ. वैशव यांनी गाण्याचा कार्यक्रम छान सादर केला. आनंदाश्रमाच्या १० वर्षांच्या यशस्वी वाटचालीला हातभार लावणाऱ्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद. मुखपृष्ठावर काही क्षणचित्रे छापली आहेत.

नव्या रुपातला स्वयम् आवडल्याचे अनेक सभासदांनी कळवले आहे. त्याचबरोबर बऱ्याच सभासदांनी स्वतःचे लेखही पाठवायला सुरुवात केली आहे. मंडळ आणि सभासद यांच्यातील दुवा असलेल्या ‘स्वयम्’ने सभासदांमधील लेखकालाही आता साद घातली आहे आणि त्याला छान प्रतिसाद मिळतोय. हे पाहून खूप छान वाटतय.

या अंकात ज्या सभासदांची ओळखपत्रे तयार आहेत त्याची यादी देत आहोत. कृपया आपण मंडळाच्या कार्यालयातून ती घेऊन जावीत ही विनंती. उर्वरीत सभासदांची ओळखपत्रे तयार झाली की कळवूच.

सर्व महिला सभासदांना जागतिक महिला दिनाच्या आणि हिंदू नववर्षाच्या, गुढीपाडव्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा .

चला तर मंडळी, पुढल्या महिन्यात भेटूच.
धन्यवाद.

सौ. कल्पना साठे

### आगामी कार्यक्रम

**सामुदायिक व्रतबंध**

**बुधवार दि. ६ मे २०१५ रोजी सकाळी ११ वा. ३ मि. या सुमुहूर्तावर सामुदायिक व्रतबंधाचे आयोजन केले आहे. नावनोंदणी सुरू आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधावा.**


कार्यकारी संपादक
- **सौ. कल्पना वसंत साठे**

स्वयम् संपादकीय मंडळ
- **श्री. विनायक कृष्णाजी लेले**
- **श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य**
- **श्री. अभय अनंत सावरकर**
- **सौ. अधिता अर्चिस लेले**
- **सौ. नीला विद्याधर वैशंपायन**
- **श्री. घन:श्याम त्रिंबक जोशी**

संपादन सहाय्य
- **हर्डीकर ॲण्ड असोसिएटस्**

मुखपृष्ठ
- **प्रज्ञा हरणखेडकर**

अंक सजावट व मांडणी
- **एपीज डिझाईन ॲण्ड प्रिन्टस्**



संपादकीय विभाग पत्रव्यवहार
- **स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,**
  भवानीशंकर रोड, दादर (प), मुंबई ४०० २८

दूरध्वनी : २४२२९११८, २४३७१९४९

कार्यालयीन वेळा :
सकाळी ८.३० ते १२.३०
सायंकाळी ४.३० ते ८.३०
रविवार बंद.

ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट :www.bsmdadar.com

# ये रे ये रे पैसा...

## आर्थिक साक्षरता

**-जयंत विद्वांस**

आपण सर्व सुशिक्षित आहोत पण आर्थिक दृष्ट्या खरंच साक्षर आहोत कां? प्रश्न थोडा पेचात टाकणारा आहे. पिढ्यानपिढ्या आपणांवर साक्षरतेचे संस्कार झालेले आहेत. आपण मुलांना खूप शिका असे म्हणतो. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या क्लासला मुलांना पाठवतो, म्हणजे चित्रकला, हस्तकला, संगीत, नृत्य पासून गणित, शास्त्र पर्यंत सर्व प्रकारचे क्लासेस मुलांसाठी पहिल्या इयत्तेपासून लावले जातात. म्हणजे ते मूल शाळा व दोन/तीन क्लासेस मध्ये संपूर्ण दिवस अडकले गेले की आई/बाबा आपल्या कामांसाठी मोकळे रहातात. ह्या process मध्ये आर्थिक साक्षरतेचे अजून क्लासेस निघालेले नाहीत. हा विषय शाळा/कॉलेजमध्ये शिकवला जात नाही. हा विषय आपणच मुलांना शिकवावा लागतो. वाण्याची मुले लहानपणापासूनच गल्ल्यावर बसायला शिकतात. ही मुले पदवीधर असतीलच असे नाही, पण आर्थिक व्यवहारांत पदव्युत्तर शिक्षित असतात असे म्हणावे लागेल.

आपण मुलांना पैसे देऊन नाक्यावरून साबण किंवा मिरच्या कोथिंबीर सुध्दा आणायला सांगत नाही. हा साधा सोपा व्यवहार दुसऱ्या इयत्तेपासून शिकवता येतो. जो आपल्या आई वडिलांनी आपल्याला शिकवलेला असतो पण मुलांना शिकवला जात नाही. आपण आपल्या मुलांना दिलेल्या पॉकेटमनीचा हिशोबही मागत नाही. म्हणून मुले त्याचा हिशोब ठेवतच नाहीत. मुलांना समजा दहाची नोट दिली आणि दोन रुपयाच्या मिरच्या, दोन रुपयाची कोथिंबीर आणि दोन रुपयाची लिंबं घेऊन ये म्हटले तर मुले हिशोब न करता, समोरून एक रुपयाची दोन नाणी दिली का, दोन रुपयाची दोन नाणी परत दिली हे न तपासता खिशात टाकतात. कारण हे चार रुपये मुलांचा पॉकेटमनी असतो. त्या जास्तीच्या पॉकेटमनीमध्ये एखाद दोन रुपये कमी जास्त झाल्याचे दु:ख नसते. आपण मुलांना ''आधी त्या पॉकेटमनीचा हिशोब दे मगच आणखी रक्कम मिळेल'' असे म्हणत नाही. त्यातच हे जास्तीचे पैसे.

सर्व मुलांकडे पिगीबँक एक खेळणे म्हणून दिलेली असते त्यात जमा झालेले पैसे खात्यात कसे भरायचे हे आपण मुलांना शिकवत नाही. बँकेची पे-इन–स्लिप मुले सहज भरू शकतात. रक्कम लहान असते. जबाबदारीने बँकेत नेऊन भरायची सवय लावता येते. आपल्याला येणारे व्याज/डिव्हीडंड किंवा इतर धनादेश मुले स्लिप लिहून भरू शकतात. आपण मुलांना हे न शिकवता ए.टी.एम.मधून रोख रक्कम काढायला शिकवतो. म्हणजे रविवारी संध्याकाळी गाडी घेऊन फिरायला निघाल्यावर ''मी पेट्रोल पंपावर पेट्रोल भरेपर्यंत तू ए.टी.एम. मशीनमधून रोख रक्कम काढून आण''. आपला वेळ असा वाचवतो. पण यातून मुलांना एक बोध होतो. पैसे लागले की मशीनमधून फर्रर्र करून पैसे मिळतात, कष्ट करावे लागत नाहीत. मशीनमधून आलेल्या नोटा कोणीच मोजत नाही परंतु, एक लाखात एका व्यक्तिस एक नोट कमी येण्याची शक्यता असते. तो एक आपणच असलो तर! माणूस चुकेल पण मशीन चुकणार नाही ही आपली श्रध्दा असते.

सध्या भारतात आणि चीन मध्ये 'सिक्स पॉकेट सिन्ड्रोम' ही नवी समस्या निर्माण झाली आहे. सुशिक्षित कुटुंबात मुलगा अथवा मुलगी, एकच अपत्य ही संकल्पना दृढ होऊ लागली आहे. पुष्कळशा मुलांचे आई-वडिल हे सुध्दा एकुलते एक असतात. अशा मुलांना कितीही महाग असल्या तरी सर्व वस्तू/खेळणी सहज मिळतात. आई नाही म्हणाली तर बाबांना विचारायचे, ते नाही म्हणाले तर आईच्या आई-वडिलांकडे हट्ट करायचा, तेही नाही म्हणाले तर वडिलांच्या आई-वडिलांकडे हट्ट करायचा. या सहापैकी एकजण तरी नक्कीच हो म्हणतो. प्रत्येकाच ा टर्न सहा महिन्यांनी एकदा येत असते. पुन्हा 'करायचे तर कोणासाठी, तर आपल्याच एकुलत्या एक मुलासाठी किंवा नातवासाठी'. या व्यतिरिक्त बक्षिस देण्यासाठी खूप संधी असतात. वाढदिवस, परीक्षेत चांगले मार्क वगैरे.

याचा परिणाम असा होतो की, ही मुले मोठेपणी गरज (need) आणि चैन (want) यात फरक करू शकत नाही. सध्याच्या जमान्यात सर्व चैनेच्या गोष्टी गरजांमध्ये परावर्तित झाल्या आहेत. गरज नसताना कर्ज सुलभ झाल्याने वस्तू खरेदी केल्या जातात. गरज म्हणून शहरात फिरायला नॅनो सोयीची असली तरी स्टेट्स म्हणून महाग गाडी सुलभ हप्त्यात घेतली जाते. (आणि नॅनो तरी गरजेची आहे काय?) क्रेडीट कार्डवर पैसे लगेच द्यावे लागत नाहीत म्हणून भरमसाठ खरेदी केली जाते. पण पुढच्या महिन्यात मिळणारा पगार (उत्पन्न) आपण आजच खर्च करीत आहोत हा विचार केला जात नाही. त्यातच भर म्हणून आता बँकांनी सर्व रक्कम भरायची गरज नाही, हप्त्यात भरा सांगायला सुरूवात केली आहे. त्यावर व्याज फक्त दोन टक्के दरमहा. म्हणजे दहा हजारास फक्त दोनशे रुपये.

मागच्या पिढीत उगाचच कर्ज काढण्याची प्रवृत्ती नव्हती. घरासाठी सुध्दा कमीत कमी कर्ज घ्यायचे व ते मुदतीपूर्वीच फेडून टाकायचे ही पध्दत होती. आता तरुण पिढीत नवरा बायको दोघेही कमावते असल्याने दोघांच्या एकत्रित उत्पन्नाच्या पन्नास टक्के रकमेचा हप्ता येईल इतके गृहकर्ज घेतलेले असते, म्हणजे 2 BHK घराची गरज असताना 3 BHK चे घर घेतले जाते. या व्यतिरिक्त वाहन कर्ज व घर सजावट आणि गृहवस्तू खरेदीसाठी कर्ज घेतलेले असते व एकूण हप्ता ७० टक्के पर्यंत जातो. दोघांपैकी एकाची नोकरी गेल्यास हप्ता भरण्यास कठीण होऊन बसते.

मग आर्थिक साक्षरता म्हणजे काय? याची व्याख्या काय?

**'आपले उत्पन्न, खर्च बचत याचे ज्ञान, आपल्या कुटुंबाचे वार्षिक अंदाजपत्रक, आपली मालमत्ता व देणी, जोखीम नियोजन व अनुशांती विमा, गुंतवणूक व प्राप्तिकर व इतर करांचे ज्ञान, वारसा हक्क व इच्छापत्र या बाबतचे ज्ञान म्हणजे आर्थिक साक्षरता.'**

कंपन्यांचे वार्षिक अंदाजपत्रक बनवणारे उच्चपदस्थ अधिकारी स्वत:चे चालू वर्षाचे उत्पन्न खर्चाचे अंदाजपत्रक बनवत नाहीत. कंपनीच्या करंट अकाऊंट मध्ये ५००० कोटी पडून राहिले तर किती व्याज बुडेल म्हणणारे स्वत:च्या खात्यात पाच लाख पडून राहिल्याचे

गणित मांडत नाहीत. म्हणून बँकांनी बचत खात्यात ऑटो स्वीप योजना काढली.

लहानपणापासून मुलांना आपण हे शिकवू शकतो. रोजचा खर्च लिहून ठेवणे हे आता इतिहास जमा झाले आहे. परंतु, रात्री शुभंकरोती म्हणण्यासारखाच हा एक संस्कार आहे.घरातील सर्वांनी रात्री एकत्र बसून सर्वांचा खर्च लिहावा. मला एकाने सांगितले की, मुलांच्या समोर खर्च लिहिणे ठीक आहे पण आपले उत्पन्न आणि वार्षिक अंदाजपत्रक सांगणे म्हणजे भयंकर आहे. मुलांच्या मागण्या वाढतील नां? परंतु, असे होत नाही. मुलांना त्यातूनच महागाई कशी वाढत जाते आहे आणि आमच्या निवृत्तीची सोय आजच्या बचतीतूनच करावी लागणार आहे हे दाखवता येते. धर्मदाय खर्च किती, कुठे कधी करावा हे दाखवता येते. अनाथ आश्रमास दिलेली देणगी मुलांच्या नावाने केली तर त्याची पावती व पत्र त्यांच्या नावाने पोस्टाने येते. या जबाबदारीचे भान येते.

लहान मुलांच्या नावाने सर्व जण गुंतवणूक करतात. या गुंतवणुकीचा अर्ज मुलांना लिहायला सांगावा. स्वत:चे नाव, पत्ता, गुंतवण्याची रक्कम कोणीही लिहू शकते. त्याला आजी/आजोबा किंवा नातेवाईकाने दिलेली रक्कम कशी वाढणार आहे, मुदतीनंतर किती रक्कम मिळेल आणि मुलाच्या वयाच्या १७ व्या वर्षी ही रक्कम पुढील शिक्षणासाठी कशी उपयोगी होईल हे दाखवावे. भरलेल्या फॉर्मची फोटोकॉपी काढावी व पावती आल्यावर फोटोकॉपी प्रमाणे तपासून पहाण्यास सांगावे. उच्च शिक्षणासाठी लागणारी रक्कम, जमा होणारी रक्कम, फरक या गोष्टी मुलांच्या लक्षात आणून दिल्यास मुले पॉकेटमनी वाचवू लागतील.

‘सिक्स पॉकेट सिन्ड्रोम’ होऊ न देता महाग खेळणी मुलांच्या पॉकेटमनी मधून घेऊन द्यावीत. कमी पडणारी रक्कम आपण घालावी. अशा पध्दतीत कदाचित खरेदी पुढे ढकलली जाईल. याची मुलांना सवय होते. मुले मोठेपणी जबाबदारीने, उत्तम रितीने अर्थव्यवहार सांभाळतात. स्वत:च्या पैशातून घेतलेली वस्तू नीट सांभाळली जाते.


हे प्रश्न उच्चमध्यमवर्गीय किंवा उच्चभ्रु समाजात मुख्यत्वे आहेत. हा भाग २००१ नंतर प्रामुख्याने लक्षात आला (सबप्राईम क्रायसीसमुळे) जी परिस्थिती अमेरिकेत भरमसाठ कर्ज काढल्यामुळे आली ती आपल्याकडे सुध्दा होऊ शकते. म्हणून सेबी, इन्शुरन्स रेग्युलेटरी ऑथॉरीटी यांनी आर्थिक साक्षरता हा उपक्रम चालू केला. सेबी द्वारा संचालित नॅशनल इंस्टिट्युट ऑफ सिक्युरीटीज् मार्केट द्वारा शाळांमार्फत पॉकेटमनी प्रोग्राम राबवला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांना सातवी आठवी पासून आर्थिक शिक्षण दिले जाते. शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना पुस्तके फुकट दिली जातात. शिक्षक तयार झाले तर दरवर्षी नवीन वर्गास शिकवू शकतात. मराठी शाळांचे दुर्दैव असे की शिक्षक यासाठी तयारच होत नाहीत. कोणत्याही कामाचा जास्तीचा मोबदला मिळत असेल तर अशा उपक्रमात ते सहभागी होतात. हा सगळाच फुकटचा कारभार. शिक्षकांना प्रशिक्षण फुकट, पुस्तके फुकट, प्रशिक्षण देणाऱ्यांचा पगार. एन.आय.एस.एम. देणार. मग शिक्षकांना पगार (जास्तीचा) कोण देणार? स्वाभाविकच मराठी शाळांचा या उपक्रमास अत्यल्प प्रतिसाद असतो.

मुंबईत (पर्यायाने महाराष्ट्रात) तीन नियामक संस्था आहेत. सेबी, रिझर्व बँक आणि वायदे बाजार नियमक मंडळ. पाच शेअर बाजार संस्था आहेत. बी.एस.ई, एन्.एस.ई, ओ.टी.सी. तीन कमोडिटी बाजार आहेत. या सर्व अकरा संस्थांनी आर्थिक साक्षरतेसाठी निधी बाजूला काढून ठेवलेला आहे. मराठी माणसांच्या दारात आर्थिक ज्ञानगंगा आहे पण ती घराघरांत नेण्यास शिक्षक तयार नाहीत.



(लेखक सेबी कडे नोंदणीकृत गुंतवणूक सल्लागार आहेत.)

**जयंत विद्वांस**
9892202011
jayantvidwans61@rediffmail.com

आयोजक
स्मितहास्य
प्रदर्शन आणि विक्री
महिला व लघुउद्योजकांनी उत्पादित केलेल्या
गृहोपयोगी वस्तूंची
भव्य ग्राहक पेठ
११ ते १५ मार्च - प्रबोधनकार ठाकरे, बोरीवली (प)
१० ते १६ मार्च - ब्राह्मण सेवा मंडळ, दादर (प)
१९ ते २३ मार्च - स्काऊट हॉल, दादर (प)
१ ते १२ एप्रिल - घंटाळी मैदान, ठाणे (प)

स्टॉलसाठी संपर्क
स्मिता पुरोहित - 9820816617
मंजुषा - 9920974024

## चित्रगाथा

# हरवलेले क्षण

-चित्रा वाघ

बऱ्याच वर्षांनी सकाळच्या गर्दीच्या वेळी ट्रेनने प्रवास करण्याचा अलिकडेच योग आला. डब्यात शिरल्यावर पर्स, ओढणी, मंगळसूत्र, घड्याळ हे सगळं जागच्या जागी आहे ना याची आधी खातरजमा करून घेतली. चक्रव्युहाला भेदून आत शिरण्याची विद्या आपण अद्याप विसरलो नाही ह्या जाणीवेने मी मनोमन सुखावले.

दरवाज्यात उभ्या राहणाऱ्या इतरांच्या बोलण्या-ओरडण्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून स्थितप्रज्ञाच्या पातळीपर्यंत पोहोचलेल्या मुली, पर्स, वेणी, पदर यापैकी काहीतरी किंवा २-३ गोष्टी खेचल्या गेल्यामुळे किंचाळणाऱ्या बायका, त्यातच पिना, टिकल्या वगैरे विकणारी पोरं, त्याच गदारोळात अमुक प्लॅटफॉर्म कुठे येणार हे विचारणाऱ्या मुग्ध बालिका.....सगळं चित्र अगदी तसंच होतं.....दहा-बारा वर्षांपूर्वी होतं ना, अगदी तस्संच!

कशीबशी आत शिरले. थोड्याच वेळात एका मुलीने तिचं स्टेशन आल्यामुळे आपल्या वाट्याची चौथी सीट मला दिली. उभं राहण्याची सवय मोडलेली मी पटकन त्या वीतभर जागेवर जाऊन बसले. एकदा सरळ, एकदा तिरकी, एकदा शेजारच्या बाकाचा आधार घेत अशा तरतऱ्हेच्या पोजेसमध्ये मी कम्फर्ट शोधत होते. अखेर सगळे प्रयत्न थकल्यावर समोर उभ्या असलेल्या एका 'चवळीच्या शेंगेला' तिथे विराजमान होण्यासाठी पाचारण केलं आणि खुर्चीचा मोह सोडला.

आजुबाजूला बघताना मात्र मला काहीतरी चुकल्याचुकल्यासारखं वाटत होतं. आणि मग इतक्या वर्षातला एक लक्षणीय बदल जाणवला तो म्हणजे त्या गर्दीतली शांतता! स्टेशन आल्यावर थोडीफार गडबड सोडली तर इतक्या बायका एकत्र असूनही एकमेकांशी फारसं कुणीच बोलत नव्हतं. बोलणं हा बहुतांशी बायकांचा स्थायीभाव. आजही डब्यातल्या जवळजवळ सगळ्याजणी अखंड बोलतच होत्या पण शब्द न उच्चारता. हातातल्या फोनवरून अंगठ्याचा वापर करत, प्रत्यक्ष समोर नसलेल्यांबरोबर त्यांचं बोलणं चालू होतं. ज्या टाईप करत नव्हत्या त्यांच्या कानाला इयरफोन्स लटकत होते आणि नजरा शून्यात....

इतक्यात एक तरूण मुलींचा घोळका हसत खिदळत गाडीत चढला. निर्जीव गर्दीला जागं करणारा! अर्थात त्या मुलींच्या गप्पाही हातातल्या फोन्सच्या साक्षीनेच चालू होत्या. त्यांच्यापैकी काहीजणी आदल्याच दिवशी 'कालाघोडा' फेस्टिवलला जाऊन आल्या होत्या. तिथे काढलेले ग्रूप सेल्फी एकमेकींना दाखवत काल मनसोक्त केलेली धमाल पुन्हा नव्याने अनुभवत होत्या. गंमत म्हणजे त्यांच्या गप्पांमध्ये त्या प्रदर्शनात पाहिलेल्या गोष्टींबद्दल, नाविन्यपूर्ण कलाकृतींबद्दल ओझरता उल्लेखही नव्हता. प्रत्येक क्षण कॅमेऱ्यात टिपण्याच्या नादात ते क्षण खऱ्या अर्थाने जगणं, अनुभवणं हे कुठेतरी राहून गेलं की काय असं मला वाटलं. मात्र याची जाणीवही नसल्याने 'ना खेद ना खंत' अशा आनंदात त्या मश्गुल होत्या.

पण एका गोष्टीचा मात्र मला हेवा वाटत होता. या वयात मित्र मैत्रिणींबरोबर घालवलेले क्षण त्यांच्याकडे त्या फोटोंच्या रुपात कायमचे बंदिस्त झाले. काही वर्षांनी या क्षणाचं महत्व कैक पटींनी वाढलेलं असेल.

पण खरंच आपण असं सुखद क्षणांना फोटोत बंदिस्त करू शकलो का? आपल्या आयुष्यातले महत्वाचे म्हणजे सर्वांच्या मते महत्वाचे समजले जाणारे टप्पे आपण फोटोबंद करतो. लग्न समारंभ, वाढदिवस, सहली, वार्षिकोत्सव, बक्षिस समारंभ, घरातली शुभकार्ये, पार्ट्या असे कितीतरी प्रसंग.

पण मुद्दाम आठवायचा प्रयत्न केला तर आपल्या स्मरणात जपून ठेवलेले, खोलवर दडलेले अनेक प्रसंग असे असतात की जे डोळे बंद केल्यावर जसेच्या तसे आपल्या नजरेसमोर उभे राहतात. अनेकदा ते प्रसंग अगदी शुल्लक असतात, सहज घडलेले असतात. ते इतके ठळकपणे आपल्या स्मरणात का राहिले याचा काही कार्यकारणभावही सापडत नाही. नुसते प्रसंगच नाही, कधी कुणाचं एखादं वाक्य, खूपसं सांगणारी एखादी नजर, एखाद्या चेहऱ्यावरचे भाव, एखादा उबदार स्पर्श, एखाद्या सुरकुतलेल्या हातांची थरथरणारी पकड अशा कितीतरी आठवणी आपली कायम सोबत करत असतात. तरीदेखील असं वाटतं की ते क्षण कॅमेरात पकडता आले असते तर?

कोकणात आमच्या घरात एक खास आंब्याची खोली होती. सुट्टीत गावला गेलं की त्या खोलीच्या पायऱ्यांवर आम्ही बसायचो. मग आढीमधून एखादा मोठ्ठा पिकलेला रसरशीत केशरी आंबा आजोबा काढून हातावर ठेवायचे. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे तृप्त हसू उमटे. कदाचित आमच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून असेल. आता असं वाटतं की तो क्षण पुन्हा अनुभवावा. आजोबांच्या मायेबरोबर, त्या आंब्याच्या उबदार स्पर्शासकट आणि खोलीभर पसरलेल्या घमघमाटासकट!

माझ्या लहानपणी आमच्या घराच्या भिंतीवर चित्रं काढण्याची, काहीही लिहिण्याची आम्हाला पूर्ण मुभा होती. सुंदर रंगाने रंगवलेल्या स्वच्छ भिंती हे टापटिप घराचं लक्षण आहे हा नियम आम्हाला माहितही नव्हता. गणिताचा गृहपाठ करताना सगळी कच्ची आकडेमोड बाजूच्या भिंतीवर करण्याचीच हाताला सवय लागली होती. झाडं, फुलं, पानं, मासे, माणसं, कौलारू घरं, नदी, डोंगर, होड्या, फुलपाखरं ही तर चारी दिशांना बागडत असायची. एकदा मी आमच्या भिंतीवर एक भला मोठा सूर्य काढला होता. हसणाऱ्या डोळ्यांचा! आमच्या घरी येणाऱ्या प्रत्येकाला हा सूर्य मोठ्या कौतुकाने दाखवला जायचा. हा सूर्य मला अगदी ओझरता आठवतोय. तो जर कॅमेरात टिपला गेला असता तर कदाचित आज तो माझ्याकडचा एक अमूल्य ठेवा झाला असता. त्यावेळी आमच्या बिल्डिंगच्या खाली एक मोठ्ठं पेरूचं झाड होतं. मी त्यावेळी केजीत किंवा पहिलीत असेन. मी, माझी मैत्रीण आणि एक मित्र असे आम्ही तिघं दुपारी अनेकदा तिथे खेळत असू. त्या झाडाच्या गुळगुळीत फांद्यामध्ये एक छान बेचका तयार झालेला होता. त्यावर बसून घरघर खेळणं हा आमचा नेहमीचाच उद्योग. यातला एक दिवस, किंवा एक क्षण म्हणता येईल, पण तो एखाद्या

फोटोसारखा माझ्या मनात ठसलाय. त्यावेळचे आमच्या तिघांच्याही अंगावरचे कपडे, बसण्याची पध्दत, ती झाडाची रचना हे सगळं माझ्या मनात चपलख बसलेलं आहे.

शाळेत आम्हाला मराठी शिकवणाऱ्या साखळकर बाई मला खूप आवडायच्या. बालकवींची 'औदुंबर', कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत', विंदांची 'घेता' अशा कविता समरसून शिकवताना त्यांचा भारावलेला चेहरा आजही आठवतो. दहावीच्या निरोप समारंभाच्या वेळी आम्ही आपापल्या डायरीत सगळ्या शिक्षकांच्या सह्या आणि संदेश गोळा करत होतो. बाईंकडे गेले की आपल्याला रडूच फुटेल असं वाटून मी त्यांच्याकडे जायचं टाळत होते. शेवटी त्याच माझ्याजवळ आल्या. माझ्या हातातली डायरी घेऊन त्यात लिहिलं, 'लिखाणात अशीच सहजता राहू दे!' आणि त्यानंतर त्यांनी मारलेली घट्ट मिठी!

आठवायला गेलं की असे कितीतरी क्षण आहेत जे आपल्या मनात एखाद्या फोटोसारखे ठसलेले असतात. फक्त आपल्यालाच दिसू शकतील असे जादूचे फोटो!

आठवणींची मात्र एक गंमत असते. असंख्य तुकडे हाती लागतात पण काही क्षण मात्र सापडतच नाहीत. कितीही आठवायचा प्रयत्न केला तरी आठवत नाहीत. दुपारी शाळा सुटल्यावर मी आणि माझा भाऊ आईच्या कुशीत दोन बाजूला दोघेजण झोपत असू. तसे शेवटचे कधी झोपलो? आजीकडे राहायला गेल्यावर ती रोज रात्री जेवण झाल्यावर गोष्ट सांगायची. पण तिने सांगितलेली शेवटची गोष्ट कुठली? तिचं बोट पकडून गोऱ्या रामाच्या देवळात कीर्तनाला शेवटचं मी कधी गेले होते? लहानपणचे तरी एकवेळ जाऊ द्या पण मोठ्या वयातले काही अनुभवही कधी निसटले, कळलंच नाही.

मुलांना शेवटची आंघोळ कधी घातली? त्यांना जेवण भरवणं नक्की कधीपासून थांबलं? चालताना आधारासाठी घट्ट पकडलेला हात कधीपासून सुटला? टिव्ही बघताना बाजूला कितीही जागा असली तरी माझ्या मांडीवरच येऊन बसण्याची माझ्या मुलाची सवय नक्की कधी सुटली? प्रयत्न केला तरी आठवत नाही.

आजच्या सहज घडणाऱ्या, रोजच्या जगण्यातल्या गोष्टीही अशाच कधीतरी विस्मरणात जातील. अजून काही वर्षांनी कदाचित आजचे सामान्य क्षण तेव्हा हवेहवेसे वाटतील.

त्या मुलींच्या फोटो काढण्याच्या नादातून हे सगळं आठवलं. यात फक्त एक बदल व्हायला हवा. आयुष्य भरभरून जगता यायला हवं. सगळे अनुभव उत्कटतेने घेता यायला हवेत. त्यातले आपल्याला सुखावणारे क्षण कुणाच्याही नकळत, आपल्याही नकळत जादूसारखे आपोआप फोटोत बंदिस्त व्हायला हवेत. म्हणजे हरवलेले पण हवेहवेसे क्षण हवे तेव्हा समोर साकारतील. पटत नाही ना? अहो, पण कल्पना करून पाहायला काय हरकत आहे?



**-चित्रा वाघ**
9821116936
chiwagh@gmail.com

**जगाच्या पाठीवर कुठेही जा, मात्र**
**ट्रॅव्हल इन्शुरन्स पॉलिसी**
**आमच्याकडूनच घ्या**



- वय वर्षे ९९ पर्यंत वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.
- पॉलिसी ५०,००० डॉलर्सपासून ५ लाख डॉलर्सपर्यंत उपलब्ध.
- आम्ही कोणत्याही इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी देतो.
- प्रिमियमचे दर अत्यंत माफक
- पॉलिसीची संपूर्ण माहिती, त्याची संपूर्ण सेवा त्वरित देण्याची व्यवस्था करतो.
- आपला काही क्लेम असेल तर आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन करुन आपली नुकसानभरपाई मिळेपर्यंत सेवा.

**श्री. अनंत पु. गोखले**
भ्रमणध्वनी : 9869526152
दूरध्वनी : 26832233

इ-२/७०३, विजयनगर सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.
email: anant2611@yahoo.co.in

# उधारमतवादी

**- अनिल हर्डीकर**



ज्ञान दिल्याने वाढते म्हणून उधार उसनवारी करू इच्छिणाऱ्या नवोदितांसाठी महत्त्वाच्या काही टिप्स देतो आहे. नोंद करा.

- उसने पैसे घेणे आणि ते परत न करणे ही एक कला आहे. ते येरागबाळ्याचे काम नोहे, हे मनावर बिंबवा.
- या क्षेत्रात नाव, कीर्ती मिळवण्यासाठी एक प्रकारची शिस्त अंगी हवी आणि निलाजरेपणाची सिद्धी प्राप्त व्हायला हवी, मित्रपरिवार दांडगा हवा आणि यथावकाश मित्रांच्या गणसंख्येला गळती लागायला लागली की नवनवीन, वेगवेगळ्या साईट्वरचे मित्र जोडण्यासाठी गोड बोलण्याचं कौशल्य अंगी /तोंडी हवं.
- पैसे उसने घेणारे ही जमात Mobilisation of funds करुन समाजाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचं योगदान करत असते.
- एका खड्ड्यामुळं मातीचा डोंगर झाला की तो गाडायला दुसरा खड्डा खणल्याशिवाय उधार उसनवार हा खेळ रंगणार नाही.
- मुळात ह्या स्वतंत्र व्यवसायात प्रवेश करण्यापूर्वी ही हीन दर्जाची ॲक्टिव्हीटी आहे वगैरे खुळचट विचार डोक्यात डोकावू देऊ नका.
- पैसे उधार मागताना आपण समोरच्याला मदत करण्याची संधी देऊन उपकृत करतो आहोत असा माज वागण्याबोलण्यातून दिसायला हवा.
- Never give up.. ''तू नही तो कोई और सही'' हे ब्रीदवाक्य मनावर बिंबवा.
- शंभर रुपये हवे असतील तर दोनशे रुपये मागा. माणसं कंजूष असतात हे लक्षात ठेवा. दोनशे मागितल्यावर कोणी लगोलग काढून दिलं तर क्वचित कधी शंभर रुपये परत करा. त्यातून गुडवील निर्माण करा. काही माणसं पैसे नाहीयेत, तेवढेच आहेत म्हणून रिकामं पाकीट दाखवतात. लक्षात ठेवा, त्यावेळी ते नोटा नसलेले कप्पे दाखवतात.
- उसने पैसे देताना काही स्मार्ट माणसं फाटक्या नोटा देतात, त्या घेऊ नका. समोरचा पैसे उसने दिल्याचा माज दाखवतो, पण त्या फाटक्या नोटा चालवताना आपला जीव मेटाकुटीला येतो. 'असून अडचण नसून खोळंबा'. त्यापेक्षा नम्र होऊन ती उधारी टाळा. आपला मान राहतो.
- 'पगाराचा दिवस आणि उचल मिळण्याचा दिवस' हे पैसे उसने मागण्यासाठी सर्वात उत्तम दिवस होत. या दिवशी कचेरीला रजा घेऊ नये.
- अलीकडे रोखठोक व्यवहार करणारे सुद्धा 'चेकाळले' आहेत. शक्यतो, रोखीचे व्यवहार करावेत. चेक घ्यावा लागला, तर तो बेअरर घ्यावा. रोख लगोलग पदरात पडायला हवी. जमल्यास बेअरर चेकची रक्कम घेताना दुसऱ्याच कोणाची तरी सही करावी.
- पैसे घेताना, परतावा करण्याचा निश्चित तारखेचा वायदा करू नये. ''देतो महिन्याभरात'' म्हणून ''जसे जमतील तसे देईन ''(नरो वा कुंजरोवा. 'जमतील' या शब्दाचा आपल्याला हवा तसा अर्थ लावावा. जमतील तसे म्हणजे collection होईल तसे आणि whenever possible असे दोन अर्थ होतात) असे म्हणावे.
- परताव्याचा वायदा करताना 'शक्य तितक्या लवकर देईन' असे वचन देणे, ही सापेक्ष वाक्यरचना आहे.
- ह्या क्षेत्रात संवाद, वाक्चातुर्य यांचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. पैसे घेताना, पैसे अंगावर असताना आणि पैशाच्या परताव्याला विलंब झाल्यावर (हा काळ अनंत आहे) अशा तीन अवस्था आहेत ज्यावेळी वेगवेगळी आचारशैलीही असावी.
- काही उधार उसने देणारे आपली गावभर बेईज्जत करतात, त्यावेळी पूर्वजांच्या ''ज्यांची इज्जत आहे त्यांची बेईज्जती होते'', वचनाचं स्मरण करावं.
- पैशाचा कुणी तगादा लावला तर,

अ. ''शंभर रुपड्यांसाठी भीक मागतोस ? उद्या देईन''. (हे तो ज्यावेळेस पैसे मागेल त्यादिवशी म्हणावे.)

ब. ''उगाच तुझ्याकडून घेतले. आयुष्यात पुन्हा एक पैसा घेणार नाही''.

क. ''तू जर अशा रितीने मला दमदाटी केल्याने पैसे मी देईन असं समजत असशील तर जीव गेला तरी मी छदाम देणार नाही. वाट बघ''.

हे असे संवाद आवडीप्रमाणे, situation प्रमाणे म्हणावे. मात्र चुकूनही पैसे परत करणार नाही असं म्हणू नये. ते एथिक्सला धरुन होणार नाही. त्याने पत कमी होते.

ड. ज्याच्याकडून आपण पैसे उधार अथवा उसने घेतलेत अशा लोकांसमोर वाह्यात खर्च करू नये. त्यांच्या नजरेत येतो.

इ. एटीएम वगैरे सोयी या व्यवसायातील अडथळे आहेत आणि संधी देखील.

- राज्ये, सरकार, देश उधार उसनवारीवर चालतात. आपणही चालायला हवं.

उधार उसनवारीच्या २ प्राथमिक पद्धती अशा-

१. Goodwill base theory- History creating theory या पद्धतीत पैसे उधार घ्यावेत. सांगितलेल्या तारखेला, त्याही आधी परत करावेत. असे एक-दोन किंवा त्याहून अधिक वेळा करावे. गुडवील त्यांच्याच पैशात करावे आणि मग उधारीची रक्कम वाढवावी आणि मग राज्य करावं. ज्यावेळी आपण पैसे परत देत नाही, त्यावेळी इतिहासाची पाने उलटून दाखवावीत.

२. बंडू फफे पध्दत - याला Double Entry Keeping असं म्हणतात. ऑफिसातील कुणा एकाकडून 'पुढच्या महिन्यात देतो' असं वचन देऊन १०० रुपये घेणे.

दुसऱ्या महिन्यात दुसऱ्याकडून १०० रुपये घेऊन पहिल्याचे परत करावेत. पुन्हा पहिल्याचे पैसे परत करण्यासाठी दुसऱ्याकडून घ्यावेत. 'कोण म्हणतं टक्का दिला' खेळ थांबवून एकदा दोघांना सांगावं की ''तुम्ही दर महिन्याला मला मधे कशाला घालता ? एकमेकांमध्ये १०० रुपयांची देवाण घेवाण करत जा.''

हा खेळ असल्याप्रमाणे खेळत जा. खूप मजा येते. माणसं आपल्याला विसरत नाहीत आणि आपल्या अनुपस्थितीतही आपला विषय मित्रांमध्ये निघतो. पैसा खेळता रहायला हवा...आपल्याला हवा तसा.



-अनिल हर्डीकर
स. क्र. ५२७० | 9819421858
hardikarsutradhar@gmail.com

Airmate A Multibrand A.C.Showroom

S.S.Dealers | LG | VOLTAS LIMITED | HITACHI Inspire the Next | Panasonic | VIDEOCON | BLUE STAR | SAMSUNG | DAIKIN | Carrier

Service Range:
- Gift on every purchase
- Exchange old with new A.C.
- Immediate delivery & installation
- On Annual Maintenance Contract
- On rental basis
- Guaranteed repairs of Indian & Imported ACs

0% Finance

Showroom : Dattatray Niwas, Shop No. 3, 'B' Block, Opp. Portugese Church, S. K. Bole Road, Dadar (E), Mumbai 28
T: 24301910, 24313073, 24302993
M: 9820043019
M: alhadaircon@yahoo.co.in
W: alhadaircon.com

## खालील आजीव सभासद क्रमांकांची ओळखपत्रे तयार आहेत. त्यांनी कार्यालयात येऊन ओळखपत्रे घेऊन जावीत.

| आ.स.क्र. | नाव | आ.स.क्र. | नाव | आ.स.क्र. | नाव |
|---|---|---|---|---|---|
| ६५७ | श्री. प्रभाकर नारायण वैद्य | २५१७ | श्री. रमेश वासुदेव काथे | ४१२४ | डॉ. मंजुषा पराग मुंगळे |
| ७३२ | श्री. उदय माधव जोशी | २५६३ | कु. माधुरी शरदचंद्र पिटकर | ४१६२ | श्री. सुहास मेघ:शाम पाठक |
| ८४१ | श्री. अनंत गोविंद गोखले | २७७२ | श्री. जयवंत नारायण आपटे | ४१६३ | कु. सुजाता सुहास पाठक |
| ८७९ | सौ. सुलोचना प्रभाकर वैद्य | २९५१ | श्री. चंद्रकांत गोपाळ कुलकर्णी | ४१६९ | श्री. सुरेश गणेश खांदेवाले |
| १०६९ | डॉ. सुधाकर मोरेश्वर साने | २९८४ | श्री. आनंद चिंतामण दाते | ४१९३ | श्री. केदार शंकर देव |
| १२९१ | श्री. धनंजय गजानन घारपुरे | ३०२४ | श्री. नागेश माधव दामले | ४२४४ | श्री. अभिजीत अशोक मुळ्ये |
| १४३० | श्री. श्रीकृष्ण निळकंठ जोशी | ३२३७ | श्री. विनय वामन शिखरे | ४२४८ | श्री. आनंद पांडुरंग सहस्त्रबुद्धे |
| १६५५ | श्री. नंदन ह. जोशी | ३२८३ | सौ. विद्या नंदकुमार राईलकर | ४२५० | श्री. अरुण काशिनाथ कानिटकर |
| १६८५ | श्री. वामन श्रीधर बापट | ३२८४ | श्री. अनंत नारायण जडये | ४२५६ | श्री. प्रकाश अनिल चितांबरे |
| १७१४ | श्री. भालचंद्र गजानन पराष्टेकर | ३३७४ | सौ. मेधा राममोहन हर्डीकर | ४२५९ | श्री. श्रीपाद यशवंत बावडेकर |
| १७२२ | श्री. सचिन दिनकर गोडबोले | ३४०३ | सौ. अनुपमा अनंत ताम्हणकर | ४२६१ | श्रीमती मंदाकिनी वसंत फडके |
| १९६० | श्री. शरद वामन अभ्यंकर | ३४०४ | श्री. अनंत वासुदेव ताम्हणकर | ४२६३ | श्री. दीपक रामकृष्ण विद्वांस |
| २०९१ | श्री. कमलाकर भास्कर कानडे | ३४३४ | श्री. बळराम सिद्धेश्वर इनामदार | ४२६५ | कु. शोभना हनुमंत साने |
| २१८३ | सौ. नलिनी म. आधारकर | ३४९१ | श्री. राजीव मनोहर कुलकर्णी | ४२६६ | श्री. मुरलीधर शंकर सुमंत |
| २२४० | श्री. अरविंद यशवंत पंतवैद्य | ३७७८ | सौ. प्रज्ञा प्रभाकर जोशी | ४२६८ | श्री. दिलीप गुणवंत अभ्यंकर |
| २२४४ | श्री. प्रभाकर शिवराम धामणकर | ३७९१ | श्री. समीर विजय जोशी | ४२६९ | श्री. विश्वास विनायक जोशी |
| २२६८ | सौ. सुमेधा सुहास मुळे | ३८९४ | श्री. मंदार मनोहर तेरेदेसाई | ४२७० | श्री. विनीत वसंत साठे |
| २३६८ | श्री. अरुण महादेव दांडेकर | ३९०६ | सौ. माधुरी प्रमोद गोडबोले | ४२७१ | श्री. जगदीश चि. कुलकर्णी |
| २४०६ | श्री. विनय शंकर दातार | ४०४० | श्री. अनंत परशुराम जोशी | ४२७५ | श्री. सुरेश गणेश दांडेकर |
| २४६६ | श्रीमती विद्या बाळकृष्ण बापट | ४०६४ | श्री. प्रकाश गोविंद नेकलीकर | ४२७६ | श्री. प्रसाद सुरेश दांडेकर |
| २५०८ | सौ. ललिता चेतन दीक्षित | ४०९९ | श्री. अवधूत गोपाळ दामले | ४२७७ | श्री. सुरेंद्र सुरेश दांडेकर |



(पान १० वर)

(पान ९ वरुन)

| आ.स.क्र. | नाव |
|---|---|
| ४२७८ | श्री. विलास अनंत डांगरे |
| ४२७९ | श्री. अनंत श्रीधर केळकर |
| ४२८९ | सौ. अंजली सुधीर जोशी |
| ४२९० | सौ. शुभदा महेश जोगदंड |
| ४२९२ | डॉ. गिरीश रत्नाकर ओक |
| ४२९५ | श्री. दीपक केशव घैसास |
| ४३०४ | सौ. रचना निशिकांत करंदीकर |
| ४३०५ | श्री. निशिकांत स. करंदीकर |
| ४३१३ | श्री. मुकुंद अमृतराव साकळे |
| ४३१४ | सौ. माधवी मुकुंद साकळे |
| ४३१५ | श्री. दिलीप यशवंत कानिटकर |
| ४३१९ | सौ. कल्पना माधव साने |
| ४३२० | श्री. श्रीराम मधुसूदन मोडक |
| ४३२१ | श्री. मिलिंद भालचंद्र रेडे |
| ४३२३ | श्री. पराग हरीहर हरकरे |
| ४३५४ | कु. सचिन सुनिल जोशी |
| ४३६७ | सौ. दीपाली समीर मालाडकर |
| ४३६९ | श्री. प्रसाद माधव बापट |
| ४३७१ | श्री. अशुतोष गुणवंत अभ्यंकर |
| ४३७२ | सौ. आरती अभय दातार |
| ४३७३ | श्री. सुबोध सुभाष हर्डीकर |
| ४३७४ | श्री. राजेंद्र त्रि. किल्लेदार |
| ४३७६ | कु. श्रद्धा शशिकांत पटवर्धन |
| ४३७८ | श्री. पुष्कराज श्रीराम पंडीत |
| ४३९० | श्री. दीपक गजानन बोडस |
| ४३९३ | श्री. मुकुंद दत्तात्रय केतकर |
| ४३९४ | श्री. सुभाष भगवान देवस्थळे |
| ४३९८ | श्री. अच्युत शंकर अभ्यंकर |
| ४४०७ | कु. शिबानी उमेश जोशी |
| ४४०८ | श्री. उमेश गोविंद जोशी |
| ४४१२ | श्री. मिलिंद बल्लाळ वैद्य |
| ४४१६ | सौ. सुनंदा विनीत दारशेतकर |
| ४४१७ | श्री. विनीत शंकर दारशेतकर |
| ४४१८ | श्री. संजय गोविंद खाडिलकर |
| ४४२१ | श्री. दीपक अनंत हुकेरी |
| ४४२३ | सौ. मेघना माधव फाटक |
| ४४२५ | श्री. राजशेखर वि. गोविलकर |
| ४४२६ | सौ. शीला अशोक पटवर्धन |
| ४४२८ | श्रीमती कमलिनी मधुकर शेवडे |
| ४४३२ | श्री. शशांक शाम करमरकर |
| ४४३८ | श्री. वैभव दीपक समुद्र |
| ४४३९ | श्रीमती धनश्री दीपक समुद्र |
| ४४४० | श्री. प्रकाश वामन जोगळेकर |
| ४४४१ | श्री. सुहास मधुकर अंचवले |
| ४४४५ | सौ. सुनंदा यशवंत मोने |
| ४४५२ | सौ. मधुरा मनोज जोशी |
| ४४५३ | श्री. विद्याधर मुकुंद अभ्यंकर |

| आ.स.क्र. | नाव |
|---|---|
| ४४५९ | श्री. प्रकाश केशव रेणावीकर |
| ४४६० | श्री. अनिल गोविंद लवाटे |
| ४४६१ | श्री. प्रसाद भालचंद्र दांडेकर |
| ४४६४ | श्री. पुरुषोत्तम नारायण आलबाळ |
| ४४७८ | श्री. मिलिंद चिंतामण पोंक्षे |
| ४४८२ | डॉ. सौ. भाग्यश्री आनंद मोघे |
| ४४८३ | श्री. आनंद वसंतराव मोघे |
| ४४८५ | श्री. लक्ष्मण हरी जोशी |
| ४४८७ | सौ. प्रज्ञा चंद्रकांत लिमये |
| ४४८८ | श्रीमती शुभांगी सतीश काळे |
| ४४९२ | श्री. अशोक वासुदेव पटवर्धन |
| ४४९४ | श्री. मिलिंद अरविंद उपासनी |
| ४५१९ | सौ. ज्योती सु. मोघे |
| ४५४१ | श्री. निलेश चंद्रकांत जोशी |
| ४५४४ | श्री. हृषिकेश विष्णु काळे |
| ४५४५ | सौ. वैशाली विष्णु काळे |
| ४५४६ | श्री. विष्णु दत्तात्रय काळे |
| ४५४७ | श्री. अमृत श्रीधर फणसे |
| ४५६३ | श्री. हरिभाऊ अनंत देशपांडे |
| ४५६४ | श्री. मिलिंद मनोहर दुमाळे |
| ४५६५ | श्री. चंद्रहास गोपाळ दाबके |
| ४५६७ | श्री. किरण लक्ष्मण चिपळूणकर |
| ४५७३ | सौ. सुचेता विजय लिमये |
| ४५७४ | श्री. विजय श्रीराम लिमये |
| ४५८२ | श्री. रोहित माधव मराठे |
| ४५९४ | ॲड. योगेंद्र श्री. जहागीरदार |
| ४५९५ | सौ. निशिगंधा यो. जहागीरदार |
| ४६२३ | श्री. विलास रामचंद्र सांडू |
| ४६२४ | श्री. वैभव विलास सांडू |
| ४६२७ | श्री. मंगेश प्रभाकर मराठे |
| ४६३१ | श्री. उदय श्रीकृष्ण टिकेकर |
| ४६३२ | श्री. संजय मोहन साठे |
| ४६३८ | श्री. संकेत संजय मुकादम |
| ४६३९ | श्री. प्रथमेश राजाराम जोशी |
| ४६४० | सौ. विद्या संजय आठल्ये |
| ४६४१ | श्री. कपिल शरद रानडे |
| ४६४२ | श्री. मकरंद मनोहर ताम्हणकर |
| ४६४४ | कु. ममता श्रीपाद लेले |
| ४६४९ | सौ. नमिता भालचंद्र जोशी |
| ४६५० | सौ. मेधाविनी योगेश पसारकर |
| ४६५१ | सौ. ज्योती अनिल बापट |
| ४६५२ | श्रीमती सुमेधा मुकुंद केळकर |
| ४६६८ | श्री. सुहास एच. दामले |
| ४६६९ | श्री. सिद्धार्थ सुहास दामले |
| ४६७३ | श्री. चैतन्य मोहन जोशी |
| ४६८९ | श्री. आनंद वसंत नरवणे |
| ४७२३ | श्री. चंद्रशेखर दामोदर भिडे |

| आ.स.क्र. | नाव |
|---|---|
| ४७७० | श्री. अभय चंद्रशेखर छत्रे |
| ४७७१ | श्री. मोहन मधुकर भागवत |
| ४७८२ | श्री. आनंद अनिल पाटणकर |
| ४७८३ | श्री. संदीप अनिल पाटणकर |
| ४८४७ | श्री. विश्वास विश्वनाथ करंदीकर |
| ४८४८ | श्री. अजय नारायण काटदरे |
| ४८४९ | श्री. सुनिल शंकर वैद्य |
| ४८५१ | श्री. मदन मनोहर बर्वे |
| ४८५२ | श्री. मंदार अरविंद मराठे |
| ४८५४ | श्री. पुष्कराज वसंत दामले |
| ४८५६ | श्री. पराग प्रकाश कुलकर्णी |
| ४८५९ | सौ. अनघा मि. बर्वे |
| ४८६० | डॉ. श्री. विवेक भालचंद्र खरे |
| ४८६५ | श्री. कपिल सुहास करंदीकर |
| ४८६९ | श्री. पारितोष विजय टिल्लू |
| ४८७२ | श्री. ओंकार श्रीनिवास सप्रे |
| ४८७३ | श्री. राजेंद्र रामकृष्ण जोशी |
| ४८७४ | श्री. मुकुंद अनंत फडणीस |
| ४८८१ | श्री. मिलिंद विठ्ठल वैद्य |
| ४८८४ | श्री. पराग भालचंद्र ठाकुरदेसाई |
| ४८८५ | सौ. पल्लवी पराग ठाकुरदेसाई |
| ४८९२ | कु. सुखदा सुभाष इनामदार |
| ४८९६ | श्री. प्रथमेश गोविंद प्रभुदेसाई |
| ४९०१ | श्री. चंद्रशेखर भास्कर आठवले |
| ४९०२ | श्री. दीपक मधुसूदन साने |
| ४९०३ | सौ. सायली दीपक साने |
| ४९०८ | श्री. उदय चंद्रकांत आचार्य |
| ४९१३ | कु. श्वेता रामचंद्र आलबाळ |
| ४९१४ | सौ. पल्लवी न. आचार्य |
| ४९१६ | श्री. संजीव मनोहर नामजोशी |
| ४९१७ | सौ. प्रतिमा संजीव नामजोशी |
| ४९१८ | श्री. सुधीर मधुकर आमडेकर |
| ४९२० | सौ. वीणा योगेश जोशी |
| ४९२१ | सौ. अनिता शरद गानू |
| ४९४४ | सौ. शुभांगी राजेंद्र देवधर |
| ४९६७ | श्रीमती पद्मा शंकर गोखले |
| ४९७६ | श्री. दिलीप वामन भागवत |
| ४९७८ | श्रीमती वीणा दिनेश चंद्रात्रे |
| ४९८४ | श्री. शैलेश विष्णू देवधर |
| ४९९४ | डॉ. वरुण अनिल भिडे |
| ४९९६ | श्री. विवेकानंद यशवंत कुलकर्णी |
| ४९९७ | सौ. स्मिता विवेकानंद कुलकर्णी |
| ४९९८ | श्री. सतीश श्रीकृष्ण कुसूरकर |
| ५०१० | श्री. अमित बाळकृष्ण कुलकर्णी |
| ५०२६ | श्री. ऋषिकेश चंद्रशेखर गद्रे |
| ५०२७ | सौ. गौतमी गजानन वडेर |
| ५०३० | श्री. शैलेश अरविंद गोंधळेकर |

# प्रवासवर्णन

## मॉरिशियस

-सौ. श्यामला वि. पळणीटकर

जगाच्या नकाशात वाटाण्याएवढा दिसणारा देश. नुकताच या देशाला भेट देण्याचा योग आला. आला म्हणण्यापेक्षा आम्हीच योग घडवून आणला. अनेक मासिकात मॉरिशसचे सुरेख वर्णन आले होते. आणि मनाने घेतले की एकदा तरी या पाचूच्या देशाला जाऊन यायचे.

शेकडों वर्षापूर्वी झालेल्या ज्वालामुखीच्या उद्रेकांपासून तयार झालेले हे एक बेट. भारताच्या दक्षिण - पश्चिम (South-West) दिशेला असलेला शांत, सुखवस्तू व सर्व बाजूंनी समुद्राचे संरक्षक कवच मिळालेला हा देश! याचा इतिहास बराचसा भारताच्या इतिहासाशी मिळता जुळता आहे. सोळाव्या शतकात या बेटाचा शोध लागताच पोर्तुगीज, डच, ब्रिटिश, फ्रेंच या सर्वांनी तेथे वसाहती केल्या. आफ्रिकेतून व आपापल्या देशांतून गरीब मजुरांना गुलाम म्हणून नेले व त्यांच्या कष्टाने छोटी छोटी गाव-खेडी तयार केली. त्यांपैकी काहींनी शेती केली, विविध वस्तूंची आवक जहाजामधून करून त्यांच्या पुढील पिढ्या येथेच राहू लागल्या. अखेरच्या सत्रात - एकोणिसाव्या शतकात फ्रेंचांनी ब्रिटि शांना, डच लोकांना येथून पळवून लावले, त्यामुळे मॉरिशियन भाषेवर, जीवनशैलीवर फ्रेंच कल्चरचा जास्त प्रभाव दिसून येतो. फ्रान्सचा राजपुत्र 'मॉरी' याच्या नावावरून या देशास मॉरिशस हे नाव पडले. समुद्र, जहाज या दोन गोष्टी येथील लोकांच्या जिव्हाळ्याचे विषय. Fishery, फळभाज्या, ऊस, कलिंगड, वांगी यांची मुबलक शेती दिसली. निसर्गाने हिरवाईची, सुपीक मातीची देणगी या देशाला दिली आहे व या देणगीची जपणूक इथला माणूस करतो. सर्व समुद्रकिनारे नितळ व स्वच्छ. Volcano पासून तयार झालेल्या आडव्या छोट्या भिंती समुद्रात आहेत. मोठया राक्षसी लाटा या भिंतीवरच फुटतात व नंतर सौम्य झालेल्या लाटा किनाऱ्यापर्यंत येतात. म्हणूनच चहूकडे समुद्र असूनही या देशाला त्सुनामीची भीती नाही, असे सांगितले जाते. अथांग सागराकडे पाहिले की ३/४ रंगांचे पाण्याचे टप्पे दिसतात. अगदी दूरवर निळा, नंतर फिक्कट हिरवा व किनाऱ्याजवळ पांढरा असा रंगांचा साज लेवून हा जलधी आपल्याला खुणावत असतो.

मॉरिशसमध्ये रेल्वे नाही. सर्व व्यवहार जहाजामार्फत व रस्त्याने चालतात. रस्त्याच्या दुतर्फा छोटे बंगले, टुमदार दुमजली घरे दिसतात. बेट असल्यामुळे या देशात बहुमजली-गगनचुंबी इमारतींना परवानगी नाही. 'पोर्ट लुईस' या राजधानीच्या शहरात अपवादात्मक उंच इमारती दिसतात. कारण येथेच सर्व सरकारी ऑफिसेस, मॉरिशसच्या पंतप्रधानाचे निवासस्थान आहे. या देशातील रस्ते प्रेमात पडावे असे आहेत. Smooth, स्वच्छ. ड्राइव्हिंग करणाऱ्यांना तर पर्वणीच! जे या चिमुकल्या देशाला जमते ते आमच्या भारतात कां होत नाही? तो देश केवढासा, तेथील लोकसंख्या कमी..असे उत्तर कोणी देतील. पण हे तितकेसे खरे नाही. इच्छाशक्ती व नि:स्वार्थीपणे कामें करण्याची वृत्ती असली की असे आदर्श चित्र दिसते.

साऊथ आफ्रिका जवळ असल्यामुळे येथे निग्रो मंडळी बरीच आहेत. शिवाय, इंग्रज, फ्रेंच यांचे वंशजसुध्दा या बेटावर स्थायिक झाले आहेत. आमच्या गाईडच्या सांगण्यावरून कळले की, येथे दंगली, मारामाऱ्या, जाळपोळ या गोष्टींचे प्रमाण अल्प आहे. विविध धर्माचे लोक गुण्यागोविंदाने रहातात. जागोजागी CCTV कॅमेरे बसवल्यामुळे वाहतुकीचे नियम, सार्वजनिक स्वच्छता याबद्दल नागरीक जागरूक असतात.

बोटॅनिकल गार्डन बघणे, समुद्रावरून Para Sailing करणे यासारखे अविस्मरणीय अनुभव येथे येऊन प्रत्येकाने घ्यायला हवेत. बोटॅनिकल गार्डनमध्ये आजवर कधीही न पाहिलेल्या वनस्पतींच्या जाती, शंभर वर्षापूर्वीचे लावलेले अवाढव्य वृक्ष, पांढऱ्या, पिवळ्या, किरमिजी रंगांच्या कमळांचे ताटवे बघून आपले डोळे सुखावतात. निसर्गाने या देशाला भरभरून दिले आहे. जास्त करून लाल भाजका दगड सर्वत्र दिसतो. बहुतांशी बांधकाम काळया व लाल दगडांचेच आहे. ऊसाची लागवड मोठया प्रमाणात होत असली तरी 'पिकते तिथे विकत नाही' या न्यायाने येथे ऊसाचा रस, साखर खूपच महाग. कारण जास्तीत जास्त साखर निर्यात केली जाते.

गंगासागर तलाव, शिवलिंग, देवीचे - नवग्रहांचे देऊळ, श्रीशंकराचा अवाढव्य पुतळा ही ठिकाणे आवर्जून पहावी अशी आहेत. येथून जवळच सप्तरंगी भूमी (Seven Colours Earth) हे टुरिस्ट लोकांसाठी आकर्षण आहे. कित्येक वर्षापूर्वी झालेल्या ज्वालामुखींच्या स्फोटानंतर भूगर्भातील लाव्हा, इतर केमिकल्स थंड होऊन या सर्व द्रव्यांची माती व रवाळ खडक बनले. ही रंगीत माती आडव्या लांबट ढिगांच्या स्वरूपात आहे. वैशिष्ट्य हे की, निळा, हिरवा, चॉकलेटी, फिक्कट चॉकलेटी, पिवळा, फिका पांढरा, काळा अशा ७ रंगात माती जमिनीला चिकटली आहे. शेकडो वर्षे ती तशीच आहे. यावर उन्हाळा, पावसाळा या ऋतूंचा काही परिणाम होत नाही. येथे गवताची काडीदेखील उगवत नाही. वाऱ्याने, पावसाने ही सप्तरंगी माती इतरत्र पसरत सुध्दा नाही! सृष्टीचे, आपल्या पृथ्वीचे हे अचंबित करणारे रूप कॅमेरात बंदिस्त करण्यासाठी जगभरातून अनेक प्रवासी येथे येत असतात. मॉरिशसचे सागरकिनारे बघत असताना गुहागर, आंजर्ले, दापोली इ. कोंकणातली ठिकाणे डोळ्यासमोर आली. ४/५ दिवसात या बेटाचा बराचसा भाग बघून झाला. बसमधून फिरताना वर निळे आकाश व भोवती हिरवीगार शेते आम्ही पहात होतो. जोडीला तो रत्नाकर चारी दिशांनी आमची सोबत करीत होता.

अशा रितीने मॉरिशसच्या सुखदस्मृती व तेथील निष्पाप निसर्ग मनात साठवून आम्ही ६ तासांचा विमान प्रवास करून स्वगृही परतलो.





**सौ. श्यामला वि. पळणीटकर**

आ. स. क्र. ७२५

## खेड्यामधले घर कौलारू !

- अनिल गोविलकर

चित्रपटातील गाण्याबाबत एक विशेष जरुर बाळगावा लागतो. त्याची शब्दकळा लिहिताना ती अधिक 'चित्रदर्शी' कशी होईल, याचा विचार प्रभावी असतो. गाणे कितीही गोड असो, त्या गाण्याच्या शब्दातून चित्र हे कौशल्याचे काम असते आणि त्यामुळेच बहुधा कविता लिहिताना प्रतिमांचा वापर हा संयमित असणे तसेच शब्द अधिक गूढ किंवा दुर्बोध नसणे ही आवश्यक गरज बनते. 'चित्रदर्शी' शब्द अशासाठी, कारण अखेर चित्रपट हे दृश्य माध्यम असल्याने मर्यादेपलिकडे शब्दांच्या पलिकडील भावाशय चित्रित करणे अशक्य असते. याचा दुष्परिणाम काही खुळचट मानदंड तयार झाले. आपल्याकडे कवितांचे संग्रह निघतात परंतु चित्रपटातील कवितांचे (काही अपवाद वगळता) संग्रह निघत नाहीत! तोच प्रकार खाजगी गीतांच्या बाबतीत घडतो. मराठीत, मंगेश पाडगावकरांचा - 'तुझे गीत गाण्यासाठी' या कवितासंग्रहाचा अपवाद वगळता, फारसे संग्रह दिसत नाहीत! त्यामुळे काही कवींवर थोडा 'अन्याय' झाला असे वाटते. ग. दि. माडगूळकर हे त्यापैकी एक असामान्य नाव. मला तर आजही असेच ठामपणे वाटते, माडगूळकरांनी 'गीत रामायण' लिहिले नसते (या कवितांचा संग्रह निघाला आहे) तर कदाचित त्यांना आजच्या इतकी लोकप्रियता मिळाली असती कां?

चित्रदर्शी कविता लिहिण्यासाठी मुळात चित्रपटाच्या पार्श्वभूमीचा सम्यक विचार जरुरीचा असतो आणि त्याबाबतीत माडगूळकरांची ग्रहणशक्ती केवळ 'अफाट' म्हणावी अशी होती.

**आठवणींच्या आधी जाते**
**तिथे मनाचे निळे पाखरू**
**खेड्यामधले घर कौलारू**

स्वरावली बाजूला ठेऊन या शब्दाचा आस्वाद घेतला तर आपल्याला आशय लगेच समजून घेता येतो. आपल्या गावात आल्यावर अचानक आपल्या जुन्या जीर्ण घरापाशी आल्यावर मनाची जी कातर अवस्था होते, त्याचे स्पष्ट वर्णन आहे. कवितेला 'काव्याचे' स्वरूप कसे आले आहे हे बघण्यासारखे आहे. 'एकाकी' अवस्थेत 'मनाचे' विरही होणे ही भावावस्था याच नेमक्या शब्दातून व्यक्त होऊ शकते. इथे इतर दुसरे कुठलेच शब्द खपणारच नाही. 'निळे पाखरू' हेच शब्द योग्य. ध्यानीमनी नसताना अचानक नजरेसमोर काहीतरी व्याकूळ करणारे घडले की जी भावावस्था होते, त्याचे शाब्दिक चित्रण!!



**हिरवी शामल भवति शेती,**
**पाउलवाटा अंगणी मिळती,**
**लव फुलवंती, जुई शेवंती,**
**शेंदरी आंबा साजे मोहरू**


**चौकट तीवर बाल गणपती,**
**चौसोपी खण स्वागत करती,**
**झोपाळ्यावर अभंग कातर,**
**सवे लागती कड्या कुरुकुरू**

**माजघरातील उजेड मिणमिण**
**वृध्द कांकणे करित किणकिण,**
**किणकिण ती हळू ये कुरवाळू**
**दूर देशीचे प्रौढ लेकरू**

सुरवातीलाच मी सगळी कविता मांडली याचे कारण, एकदा गाणे म्हणून आस्वादाला सुरवात झाली की मग परत शब्दकळेबाबत फारसे लिहिणे थोडे अवास्तव ठरेल. एक गाव, तिथे असे अचानक येणे, त्याच अवस्थेत आपले पूर्वीचे जुने डोळ्यासमोर येणे आणि त्यातून आलेली व्याकूळ अवस्था!! त्यानिमित्ताने मनात उमटलेले भूतकाळाचे तरंग इत्यादी सगळ्या भावना कवितेच्या रुपात अत्यंत संक्षिप्तपणे मांडणे नक्कीच सोपे नाही. चित्रपटातील गाणे असल्याने, कवितेत जे मांडायचे, त्याचे चित्रिकरण घ्यायचे आहे, तेव्हा मनाची कातर अवस्था असली तर ती अवस्था चित्रात दाखविणे अशक्य, तेव्हा शब्दांचा अव्याहत फुलोरा टाळून अचूक भावदर्शन घडविणे याच विचाराने गदिमांनी शब्दरचना लिहिली आहे.

हिरवी शेती, अंगण, तिथल्या वेली, घरातील गणपती, झोपाळा, मिणमिण उजेड आणि शेवटी प्रौढ लेकरू!! असा सगळा आयुष्याचा व्यापक पट, कवितेसारखा अल्पाक्षरी शैलीत तितक्याच संपृक्ततेने मांडणे, हे सहज येता-जाता जमण्यासारखी बाब नव्हे. माडगूळकर म्हणजे मराठी संस्कृती पचवलेला कवी. या कवितेतील घराचे जे चित्रण केले आहे, ते खरंच अभ्यासण्यासारखे आहे. प्रत्येक शब्दातून, ते घर, तिथल्या वस्तू आणि त्या जोडीने आलेला जिवंत मातीचा संदर्भ, यामुळे ही कविता अगदी 'आतून' बांधलेली आहे. इथे दुसरा कुठलाही शब्द 'उपरा' आहे.

गाण्याची सुरुवात सरळ 'गात्या' शब्दाने होते म्हणजे आधी एखादी धून आणि मग शब्द असा पारंपारिक 'घाट' न स्वीकारता, सरळ सुरेल चालीत बांधलेले शब्द कानावर येतात. गायनाच्या दृष्टीने हे तस अवघड असते. अगदी



त्यात काय चुकले? केवळ मराठीच कशाला, माझ्या अंदाजाने, जगातील कुठलाच संगीतकार, ज्या प्रदेशात तो वाढतो, त्या संस्कृतीचे जोखड संपूर्णपणे बाजूला टाकू शकत नाही! त्या संस्कृतीचा प्रभाव त्याच्या कलेत अंशरुपाने आढळत असतो. त्यालाच तर संगीतकाराची शैली म्हणतात. प्रश्न असा असतो, ही शैली त्या संगीतकाराला तारक की मारक? स्वतःची ओळख ठसविण्यासाठी शैली ही उपकारक असते पण दीर्घकालीन कारकिर्दीत तीच ओळख मर्यादा होऊ शकते! असो.

रागदारी संगीत घेतले तरी रागाला सुरवात होण्याआधी झमझमणारा तंबोरा गायकाला सूर पुरवत असतो. त्यादृष्टीने अशा पध्दतीने गाण्याची सुरुवात करायची म्हणजे डोक्यात सगळे सूर नेमके ठेऊन सुरवात करावी लागते.

सुधीर फडक्यांच्या चाली तशा सहज जरी असल्या तरी त्यात अनेक वेगवेगळ्या धाटणीच्या हरकती असतात, ज्यायोगे शब्दांना सुरांतून काढताना वेगळे परिमाण मिळते. इथेच ऐकण्यासारखी एक हरकत आहे. 'तिथे मनाचे निळे पाखरू' मधील 'निळे' शब्द सुरांत घेताना, त्याला छोटीशी हरकतीची जोड दिली आहे, त्यामुळे तोच शब्द वेगळ्याच अर्थाने आपल्या समोर येतो. ही करामत आधी बाबूजींची आणि नंतर त्याचे प्रत्यंतर देणाऱ्या आशा भोसले यांची!!

वास्तविक गाणे गत:स्मृतींच्या संदर्भात आहे तरी आठवणी सगळ्या आनंददायी असल्याने चाल जलद लयीत बांधली आहे. गाणे जलद लयीत बांधण्याचा एक फायदा असा होतो, गाण्याला तालाची जोड मिळते आणि तेच गाणे आपल्या मनावर लगेच ठसते.

बाबूजींच्या रचनेबाबत एक आक्षेप बऱ्याचवेळा ऐकण्यात / वाचण्यात येतो. या संगीतकाराच्या चाली 'ब्राह्मणी' ढंगाच्या असतात!! म्हणजे काय? संगीतात असा काही 'ढंग' आहे का? बाबूजींचा शब्दोच्चारावर विशेष भर असायचा आणि ब्राह्मण लोकं त्याबाबत अधिक दक्ष असतात म्हणून संगीत रचना ब्राह्मणी असतात, असे सुचवायचे आहे का? चाली मराठमोळ्या असतात, तर मग मराठीत इतर संगीतकार देखील या आक्षेपात येऊ शकतात! त्यातून, चाल ही शब्दांना दिली जाते. जे शब्द हाती असतात, त्या शब्दांना सुरांच्या सहाय्याने न्याय देणे, हे संगीतकाराचे 'आद्य' कर्तव्य! मराठी ही एक संस्कृती आहे आणि त्यानुरूप जर त्याचे प्रतिबिंब कलेच्या सादरीकरणात पडत असेल तर

**'चौकट तीवर बाल गणपती'**

इथे 'गणपती' शब्दानंतर 'ई'कार कसा सुरेख लांबवलेला आहे. जलद लयीत असे प्रयोग करायला तसा थोडाच वाव असतो पण असतो. तालाचे वर्तुळ ध्यानात घेऊन आणि समेच्या मात्रेचे भान ठेऊन(च) अशा हरकती घेता येतात आणि गाण्याचे सौंदर्य अधिक खुलवतात.

या गाण्याची आणखी खास गंमत आहे. शेवटच्या कडव्यातील शब्द 'किणकिण ती हळू ये कुरवाळू, दूर देशीचे प्रौढ लेकरू' यातील 'किणकिण' हा शब्द आणि नंतरच्या ओळीतील 'लेकरू' हे शब्द जरा बारकाईने ऐकले तर कळेल. या दोनच ओळीत माडगूळकरांनी सगळे भावचित्र उभे केले आहे आणि त्यातील ते दोन(च) शब्द निवडून, बाबूजी आणि आशा भोसल्यांनी स्वतःची स्वरिक भर टाकली आहे. आशय स्वरांच्या सहाय्याने खुलवावा, तो असा. तसे बघितले तर चालीत फारसे अवघड काहीही नाही (फक्त काही शब्दांवरील हरकती सोडल्यास!!) पण चालीत एक अमूर्त गोडवा आहे त्यामुळे गाणे ऐकताना, आपण त्यात गुंग होऊन जातो.




-अनिल गोविलकर
9819931372
govilkaranil@gmail.com


## थोडे कोडे

१. तेहतीस कोटी

□□

२. मराठी चित्रपटसृष्टीतला

□□□ □□

- नायकही, खलनायकही

३. कुलकर्ण्यांची सून

□□□ □□

- रमा

४. मराठी संगीतक्षेत्रातील यशस्वी

□□□□ □□

- संगीतकार, गीतकारही

५. सराफांची लेक देवघरात आलेली

□□ □□

- सुवासिनी

६. भारतीय क्रिकेटमधला जवाब नही असा

□□□ □□

- माजी खेळाडू

७. हिंदी चित्रपटसृष्टीतला फारसा लोकप्रिय नसलेला

□□□□

- गुणी संगीतकार

८. योगायोगानं घरात शिरलेला

□□□□

- बाबा

९. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी

□□□□ थापर

१०. हिंदी चित्रपटसृष्टीतील चॉकलेट हिरो

□□ आनंद

उत्तरे - १ देव २ रमेश देव ३ मृणाल देव ४ यशवंत देव ५ सीमा देव ६ कपिल देव ७ जयदेव ८ रामदेव ९ सुखदेव १० देव

# टाऽऽटा ते टाटा

-डॉ. अशोक कोर्डे




एखादी वस्तू आपल्याला नक्की लागणार म्हणून आपण आठवणीने नीट ठेवतो. त्या वस्तूवर काही दिवसांनी अनेक वस्तू येऊन पडतात. आपल्याला लागणारी वस्तू त्या ढिगाऱ्यात अशी काही लापता होते, की त्या वस्तूची आपल्याला आठवण पण रहात नाही. केव्हातरी गम्मत अशी होते की, दुसरंच काही तरी आपण शोधायला जातो अन् विस्मृतीत गेलेली ती वस्तू आपल्याला गवसते. अचानक ती मिळाल्याचा विस्मय आपल्या मनांत आनंद फुलवत रहातो......

आठवणींचं असंच असतं... कारण घटनाच तशी घडते....

साधारण ९२-९३ सालातली घटना आहे ही. माझ्या रुग्णालयाचा पसारा वाढू लागला होता. कर्मचारी वर्ग दर दोन दिवसांनी नोकरी सोडून जायचा. पुन्हा स्टाफ शोधण्यासाठी धावाधाव. पेशंटच्या चिकित्सेची डोकेदुखी नसायची पण स्टाफ शोधण्यासाठी प्रचंड डोकेदुखी व्हायची. मुख्य म्हणजे नर्सेसची कमतरता. 'शिक्षित, अनुभवी, कामसू, हसतमुख इ. इ. परिचारिका पाहिजेत' ह्या जाहिरातीला प्रतिसाद शून्य असायचा. मग ११/१२ वी शिकत असलेल्या, नर्सिंग कोर्स करत असलेल्या विद्यार्थिनी नर्सेस म्हणून घेण्यास सुरूवात केली. काही पोरी शिकायच्या, काही कंटाळायच्या, तर काही चक्क पळायच्या.

पण एकदा अशीच एक बारावी नापास झालेली मुलगी आली. मी तिला विचारलं ''तुला नर्स व्हायचंय?'' ''तुला नर्सिंगचं शिक्षण कुणी दिलंय?'' ह्या माझ्या प्रश्नांनी ती अवाक् झाली. सावळी, कृश अंगकाठी पण हसतमुख, अंगावर गरिबीच्या खुणा, बापुडी-चिमुरडी मुलगी मला म्हणाली, ''तुम्ही शिकवलंत तर मी शिकेन...पण मला नर्सताई व्हायचय'' मी तिला आपादमस्तक न्याहाळत विचारलं ''कां, नर्सच कां?'' तशी ती म्हणाली ''मला पैसे मिळवायचेत'' तिचे स्पष्ट विचार मला आवडले. तिचे उद्दिष्ट साफ होते, ध्येय पण ठरलेलं होतं. उगीचच 'रुग्णसेवा' वगैरे आदर्शवादी विचार नव्हते, तिची पगाराची अट नव्हती. फक्त गाडी भाड्याची अपेक्षा होती. मी तिला सांगितलं, ''काम करता करता शिकायचं अन् शिकता शिकता काम करायचं, चालेल?'' ''नक्की, नक्की'' ती उद्गारली. हे दोन शब्द ती आत्मविश्वासानं म्हणाली, पण त्यात वेगळीच लकब होती. तिच्या एकंदर बोलण्यातच एक आपुलकीची लाडिकता होती. बाळबोध बावळटपणा नव्हता किंवा अवास्तव बालिशपणा नव्हता. ''कधी येशील?'' ला तिचं उत्तर अनपेक्षित होतं....''आत्ताच. काय काम करू?'' तिने प्रश्न विचारला. मी म्हटलं, ''ह्या मोठ्या सिस्टरबरोबर रहा. ती काम सांगेल ते तू कर'' ती म्हणाली ''नक्की, नक्की'' तिची ती लकब पुन्हा कानावर पडली.

तिचं नाव स्मिता. आडनाव विसरलो. पण काहीतरी विचित्रच होतं. सदा हसतमुख, तुडतुडीत, उत्साहाने भरलेली. दुर्मुखता तर कधीच नाही. वेळेपूर्वी यायची व घरी जायला कंटाळायची! कोणत्याही कामाला ना नसायचा. एकदा शिकवलं की ते काम कायमचं लक्षात ठेवायची. प्रत्येक बाब उत्सुकतेने विचारायची. समजून-उमजून करायची. मधून मधून ''नक्की, नक्की'' ची जपमाळ ओढायची. स्वतःच्या परिवाराबद्दल, परिस्थितीबद्दल कधीच बोलत नसे, पण एकदा परत परत विचारल्यावर बोलली. ''आई नाही, छोटा भाऊ पाच-सहा वर्षांचा, वडील रोजंदारीवर व पक्के दारूडे, घरात दारिद्रय. घरात नैराश्यपूर्ण वातावरण. कसंही करून थोडं फार शिकायचं, नोकरी करायची अन् पैसे मिळवायचे.'' भावाला शिकवायचं हे तिचं ठरलेलं होतं. हे सर्व सांगताना स्मिता एकदाच 'अ'स्मिता झाली. रडवेली झाली. मी म्हटलं, ''तुला पैसे मिळायला लागतील. तुझं लग्न होईल''...तशी हसत-लाजत ती म्हणाली, ''नक्की, नक्की!''

तिला मी युनिफॉर्मसाठी पैसे दिले. पांढऱ्या युनिफॉर्ममध्ये ती एकदम स्मार्ट दिसायला लागली. म्हणाली, ''मी तुमचे सर्व पैसे फेडेन'', तिचं बारावी होणं महत्वाचं होतं. त्यासाठी फी, पुस्तके वगैरे मी दिले. ती कशीबशी बारावी झाली, पण ती माझ्या रुग्णालयात एवढी रमली की तिला तिचं घरच वाटू लागलं. नंतर तिला नर्सिंगमध्ये पदवी घेण्यास भरीस पाडलं. 'नाही नाहीच' म्हणत होती. तिचं त्या नकारामागचं योग्य कारण होतं, आर्थिक परिस्थिती. पण एका ब्राह्मणांच्या समाज संस्थेतून, प्रसंगी वाद घालून मी तिला 'नर्सिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीस' मदत मिळवून दिली. 'वाद घालून' कारण कोणी एका दात्याने, 'ब्राह्मण विद्यार्थिनीस भरघोस आर्थिक मदत देऊ केली होती.' ब्राह्मण विद्यार्थिनी नर्सिंग पदवी घेण्यास मिळत नव्हती. त्यामुळे ती रक्कम संस्थेत वर्षानुवर्षे पडून होती. त्या मदतीमुळे तिचे शिक्षण सुरू झाले.

बी.एस्सी, नर्सिंगला तिला प्रवेश मिळाला. त्या उच्च शिक्षणासाठी जायचे म्हणून माझ्याकडील शिक्षण व नोकरी तिला सोडावी लागली.

सर्वांनी तिला निरोप देताना, ''भेटायला ये अधून-मधून'' म्हणून सांगितले व आम्ही सगळेच एकदम म्हणालो, ''नक्की, नक्की''. ती मनमुराद हसून निघून गेली. पाच मिनिटात ती परत आली न माझ्या पायाला हात लावत मला म्हणाली, ''मला विसरू नका सर.'' नंतर पुन्हा



निरोप समारंभ झाला. शेवटी लहान मुली सारखी हसत हसत म्हणाली, ''टा...टा..!!''

त्यानंतर ती एखाद-दुसऱ्या वेळेस आली असेल. मग फोनवर बोलणे, मग मात्र पूर्णविरामच...इतका की मी स्मिता नाव फक्त लक्षात ठेवू शकलो. माझ्या कामात गर्क-व्यस्त राहिलो. तिचा काही संबंधच राहिला नाही. १७/१८ वर्षे तरी झाली....

एक-दोन महिन्यापूर्वी एक महिला रुग्ण आली होती. तिचे रिपोर्ट्‌स पाहिले अन् लक्षात आले की तिला कर्करोग आहे. त्या बाई व तिचा परिवार हादरलाच. फॅमिली डॉक्टर म्हणून मार्गदर्शन व प्रचंड धीर देण्याचं माझं कर्तव्य मी पार पाडलं. टाटा हॉस्पिटलमध्ये तज्ञ डॉक्टरकडे जाणं भाग होतं. टाटाचे नाव ऐकताच तिचं अवसानच गळालं. माझी समजूत घालण्याची पराकाष्टा झाली न ती बाई तज्ञ डॉक्टराकडे जायला तयार झाली. 'पण तुम्ही माझ्याबरोबर आलात तरच' अशी तिनं अट घातली. मी साधारणतः अशा पेशंटसह तज्ञांकडे जात नाही. पण तिला दिलेलं आश्वासन टाळता येणं अशक्य झालं.

दुसऱ्याच दिवशी सकाळी आम्ही टाटा हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. मी, पेशंट व तिचा नवरा. सर्व वातावरण चित्रविचित्र, दुःखी-कष्टी, निराशमय रुग्णांनी भरलेलं होतं. त्या तज्ञ डॉक्टरांच्या वेटींग-रूममध्ये असंच दृष्य दिसतं. माझी पेशंट अधिकच विवश झाली. मी डॉक्टरांची पाटी वाचली अन् माझा तो मित्रच असल्याचे लक्षात आले. मी तेथील वार्डबॉयला माझे नाव चिठ्ठीवर लिहून आतमध्ये देण्यास सांगितले. त्याने ''असेच सगळे आत घुसतात'' ह्या नजरेने माझ्याकडे पाह्यले न चिठ्ठी घेऊन आत गेला. दोनच मिनिटात ते तज्ञ डॉक्टर बाहेर आले. पाठीवर थाप मारत मारत मला म्हणाला, ''अरे ! तू ? किती दिवसांनी भेटतोयेस! आतला पेशंट पाहतो न बोलवतोच तुला''. माझ्या पेशंटचा उभा चेहरा बसल्या बसल्या पूर्ववत गोल झाला.

थोड्याच वेळात मला वॉर्डबॉयने अदबीने (!) बोलविले.

मी पेशंटसह आत गेलो. प्राथमिक गप्पा झाल्या. 'तो कसा आहे, ती कुठाय' चा सिलसिला झाला. मग पेशंटसंबंधी चर्चा झाली. तपासणी पेपर त्याने बघितले. पेशंटला तपासण्यासाठी तो माझ्या पेशंटला पडद्यामागे घेऊन गेला. आत जाताना त्याने नर्सला पेशंटसंबंधी सूचना दिल्या. अन् मला म्हणाला, ''माझी ही नर्स आहे ना, ही एकदम हुशार आहे. आतमध्ये ती एवढी तयारी जय्यत ठेवते ना, माझं ७५ टक्के काम तीच करते. त्यामुळे माझी कामं फटाफट संपतात,म्हणून मी लवकर मोकळा होतो. आय ॲम डॅम लकी'', त्याची कौतुक एक्सप्रेस चालूच राह्यली. आत त्याची न माझ्या पेशंटची प्रश्नोत्तरे चालू झाली. तपासणी झाल्यावर तो म्हणाला, 'सिस्टर, ह्या सर्व टेस्ट ह्यांच्या पेपरवर लिहून ठेव. अजून दोन नवीन टेस्ट सांगतो त्या पण लिही.' सिस्टरने लगेचच म्हटलं ''नक्की, नक्की''.

मी तंद्रीतून जागा झाल्यासारखा बाहेरूनच ओरडलो, ''अरे! सिस्टरचं नाव स्मिता आहे काय?'' तो हात पुसत बाहेर येत म्हणाला ''यार, तुला कसं माहिती? तू तिला अजून पाह्यलं पण नाही. सिस्टर बाहेर ये''. माझा अंदाज खराच ठरला. ती स्मिता सिस्टरच होती. ती तर मला पाहून हसत-हसत रडायला लागली अन् रडत रडत हसायला लागली.

''नक्की, नक्की''ह्या शब्दाने आठवणींच्या अथांग सागरातला नेमक्या शिंपल्यातला मोतीच मला सापडला होता.



**डॉ. अशोक कोर्डे**
**9820435204**


## नामजोशी शिष्यवृत्ती

भारतातील चित्पावन आणि इतर ब्राह्मण ज्ञातीतील यु के आणि यु एस मध्ये राहून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नामजोशी शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल, मात्र त्यांनी एखाद्या ब्राह्मण संस्थेचे सभासद असणे आवश्यक आहे. अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज त्या संस्थेच्या पत्रासह करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संस्थेच्या कार्यालयात चौकशी करावी.

# ढोल ताशे

-गणेश आचवल

तुम्ही आम्ही सर्वच संस्कृती प्रिय असतो. एक वाक्य वाचलेलं आठवतं की, **भारतीय संस्कृतीचा इतिहास हा कुठल्या पुस्तकात सापडत नसून तो येथील सण आणि उत्सवांच्या पानात सापडतो.** हा महिना म्हणजे इंग्रजी दिनदर्शिकेप्रमाणे मार्च असला तरी मराठी महिन्याप्रमाणे फाल्गुन महिन्याला निरोप देऊन आपल्याला चैत्राचे स्वागत करायचे आहे. फाल्गुन पौर्णिमा म्हणजे होळी. हुताशनी पौर्णिमा. कोकण प्रांतात हा सण शिमग्याचा सण म्हणून मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. अजूनही कोकण प्रांतात या दिवशी शंकासुराचे रूप अर्थात सोंग घेऊन काही जण येतात. खेळे नाचतात. 'आयना के बायना घेतल्याशिवाय जायना' असे म्हणत काही लोक पैसे सुध्दा मागतात. सणांच्या निमित्ताने प्रकृती, विकृती आणि संस्कृती या तिन्ही गोष्टी दृष्टीस पडतात. होळीसाठी जेव्हा अग्नी प्रज्वलित केला जातो, होळी पेटवली जाते, तेव्हा प्रकृतीचे दर्शन घडते. होळीला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण केला जातो, तिथे संस्कृती दिसते. शहरात ज्या पध्दतीच्या विकृतीचे दर्शन घडते, ते इथे सांगावेसे वाटते. एकीकडे पर्यावरणवादी लोक होळीसाठी लाकडांची तोड करू नका असे सांगतात तर दुसरीकडे मुंबई पुणे सारख्या शहरात होळीच्या दुसऱ्याच दिवशी एकमेकांना रंग लावून एकमेकांवर पाण्याचे फुगे सुध्दा मारतात. गावामध्ये तर होळीनंतर जी पंचमी असते त्या दिवशी लोकांना गुलाल लावला जातो. पण मध्यंतरी काही किस्से असे ऐकले की या पंचमीच्या दिवशी जो अपरिचित सुध्दा रस्त्यावरून जात असतो, त्यालाही थांबवून रंगवले जाते आणि त्याच्याकडून जबरदस्तीने पैसे घेतले जातात. धुळवड साजरी करताना आपण आपल्या आनंदासाठी दुसऱ्याला त्रास देतो ही गोष्ट खूप चुकीची आहे.




फाल्गुन संपताच चाहूल लागते ती चैत्राची. गेले जवळ जवळ दहा वर्ष आपण ठिकठिकाणी गुढी पाडवा शोभायात्रेचे आयोजन करतो, ही स्वागतार्ह बाब आहे. डोंबिवली, गिरगाव, दादर, ठाणे, पनवेल अशा अनेक ठिकाणी हिंदू नववर्ष स्वागत यात्रा निघते. या यात्रेच्या वेळी चित्ररथ निघतात. ध्वज पथक, ढोल पथक, ताशा पथक अशा अनेक पथकातून तरुणाई मोठ्या प्रमाणावर दिसू लागते. पाडव्या पूर्वी अनेक जण ढोल ताशा याचे रीतसर प्रशिक्षण घेतात.

या सगळ्या सणासुदीच्या वातावरणात आणखी एक फिव्हर निर्माण झालाय, तो म्हणजे 'विश्व चषक फिव्हर'. या आधी जेव्हा आपल्याला वर्ल्डकप मिळालेला होता तेव्हा त्या नंतर येणाऱ्या गुढीपाडव्याला यात्रेत चित्ररथात 'विश्व चषक' हा विषय प्रामुख्याने मांडला होता. सचिन तेंडुलकरचे अभिनंदन करणारे आणि त्याची आरती गाणारे चित्ररथसुध्दा त्या यात्रेत होते. एका ठिकाणी या यात्रेच्या प्रमुख पाहुण्या म्हणून अनुराधा गोरे आल्या होत्या आणि त्यांनी त्या यात्रेतील युवकांच्या संघटनावर उत्तम विचार मांडले. त्याच मुद्याविषयी थोडं बोलावंसं वाटतं. आजच्या काळात युवकांनी संघटीत होऊन नवीन आव्हानांना सामोरे जावे असा विचार त्यांनी मांडला होता.

सध्या विविध क्षेत्रात तरुणाई आपले प्रतिबिंब दाखवून देत आहे. कॉर्पोरेट जगतात काम करता करता आपली संस्कृती काय याची ओळख व्हावी या हेतूने युवकांना त्यांच्यातील काही जण लेझीम, ढोल याचे शिक्षण देत आहेत. पण एकदा का पथक तयार झाले की ते पथक किती वर्षे कायम टिकते, याचा सुध्दा विचार करणे गरजेचे आहे. प्रथम एक पथक तयार होते आणि मग त्याच पथकातील काही जण बाहेर पडून दुसरे वेगळे पथक तयार करतात. दुसऱ्यातून तिसरे पथक तयार होते, पण त्यातून एक विचित्र स्पर्धा गेली काही वर्षे निर्माण झाल्याचे दिसते. पथकामध्ये राजकारण सुरू झाले की संपले. राजकीय पक्षसुध्दा स्वार्थ साधण्याकरिता या पथकांचा वापर करतात. म्हणजे सणामुळे लोक एकत्र येण्यापेक्षा दुरावले जातात. 'ढोल ताशे' नावाच्या एका चित्रपटात हा विषय मांडण्यात आला आहे.

शिवाय, या यात्रातून लोकांना हवे असतात सेलिब्रिटी. सेलिब्रिटी एक व्यवहार म्हणून अर्थात पैसे कमवण्यासाठी या यात्रांचा वापर करतात (काही अपवाद वगळता). सेलिब्रिटी त्यांच्यात बोलताना 'कोठे सुपारी मिळाली आहे रे पाडव्याची?' असे विचारतात. तर काही वाहिन्या आपल्या प्रमोशनसाठी या यात्रेत आपल्या कलाकारांना सहभागी व्हायला लावतात. यात्रेत सहभागी झाल्यावर दोन दिवस फेसबुक आणि इतर साईट्सवर फोटो अपलोड होतात आणि आपल्याला किती 'लाइक्स' मिळाले हे बघण्यात सर्व जण धन्यता मानतात. यात्रा संपते आणि मग नीट विचार केला की मनात असे असंख्य प्रश्न निर्माण होतात. आपण काय साधले? आपण या यात्रेतून संघटन दाखवले, लोकांना एकत्र केले की आपल्याच परिसरातील आपले श्रेष्ठत्व दाखवले?

दुसऱ्या दिवशी यात्रेचे फोटो पाहता पाहता इंग्रजी माध्यमात शिकणारा एक मराठी मुलगा बाबांना विचारतो, 'बाबा, काल गुढीपाडवा झाला म्हणजे नक्की काय झालं? आपले happy न्यू इअर होते का काल?' त्याच्या या प्रश्नाला बाबा काय उत्तर देणार?...



**-गणेश आचवल**
9833268391
athatharvbharadwaj@gmail.com

....................................हे पान **श्री. संतोष वैद्य** यांजकडून...............................

# तिन्हीसांज

नीला वैशंपायन

गेल्या वर्षी तळेगावला आमचं second home म्हणा किंवा कर्जसवलतीसाठी केलेली गुंतवणूक म्हणा, एक छोटीशी सदनिका घेतली. क्वचित कधीतरी तिथे जाणं होऊ लागलं. ही इमारत थोडीशी आतल्या बाजूला रहदारीपासून लांब आहे. एक दोन दिवसांचं वास्तव्य असल्याने तिथे TV नाही fridge नाही. अर्थात शांतता तर इतकी की mobile चं vibration सुध्दा १५-२० फुटांवरून ऐकू यावं. त्या दिवशी संध्याकाळी सातच्या सुमारास खिडकीत उभी राहून चांदणं पहात होते, इतक्यात कुठूनसा झांजा वाजवून आरती करत असल्याचा आवाज आला. पाठोपाठ कुणीतरी हा बोल म्हटल्याने, ३५ वर्षाचा परतीचा प्रवास करून मी क्षणात वर्तमानात परतले. पण माझं मन मात्र मला पुन्हा ३५ वर्ष मागे घेऊन गेलं.

८/१० वर्षांची मी, पेणला माझ्या आजोळी जात असे. शेजारच्या घरात यमुताई नावाच्या एक बाई सवाष्ण असूनही एकट्या रहात. दिवसभर त्यांचं दार बंदच असे. बहुधा स्वैपाकाची वगैरे कामं करत असाव्यात. संध्याकाळी घरी परतत, आणि मग रोज तिन्हीसांजेला झांजा वाजवून आरती करत. अतिशय नाजूक किणकिणाऱ्या त्या झांजा, रातकिड्यांचा किर्रर्र आवाज, डासांपासून बचाव म्हणून बंद खिडक्या, दारे, मधूनच आपलं आवाजी अस्तित्व दाखवणारी मनीमाऊ, चुलीवरच्या आमटीत लोखंडी पळीत केलेली फोडणी बुडवल्याचा चुर्र आवाज.. आणि जगातल्या कुठल्याही perfume शी जवळीक सुध्दा ना साधणारा तो वास...डोळे मिटून पोटभर श्वास घेतला आणि काहीवेळ तरी त्याच काळात रमण्याचा प्रयत्न केला. कमरेत पूर्ण वाकलेल्या आजी (आम्हाला आईने अहो आजी म्हणायची सवय लावली होती) नावाने सुध्दा अन्नपूर्णाच होत्या. मिटल्या तोंडी सकाळच्या पारीला ताजा आमटीभात आणि डाव्या बाजूला कधी बोटावरची मिरगुंड, कधी भाजलेला पोह्याचा पापड तर कधी विझलेल्या चुलीच्या धगात न करपता खरपूस भाजलेला काडेकंड. त्या आठवणींची उब कढत होऊन डोळ्यातून पाझरू लागली. एका झांजेच्या आवाजात ३५ वर्ष काळ मागे सरकवण्याची केवढी अद्‌भूत ताकत होती ?

रात्री जेवण वेळेवर म्हणजे आठ सव्वाआठला होत. त्या आधी रोज नेमाने रामरक्षा, गीतेचा अध्याय होत असे. जेवणं झाल्यावर अंथरूण घालून दिवे मालवून रेडिओ, गोष्टी ऐकत झोपायचं. सकाळी उशिरा म्हणजे सात-साडेसातपर्यंत उठण्याची मुभा असे. तिथल्या बाथरूममधे कायम मोती साबण असे, त्या न्हाणीघरात यामुळे एक विशिष्ट वास घुमलेला असायचा. आंघोळी झाल्या की सोवळे नेसलेल्या आजी काळीमिरी घातलेली कण्हेरी पुढे ठेवायच्या. ती प्यायची आणि खेळायला बाहेर. घरापलीकडे एक गोठा होता, त्या गोठ्यात बसून गायीम्हशींच्या शेणाचा वास घेत मी तासनतास बसत असे. दुपारी नाना म्हणजे आमचे आजोबा वैश्वदेव करत. खेळलेल्या पायांनी पुढच्या दारांनी आत आलेलं चालत नसे, मग बाजूच्या बोळातून मागील दारी जायचं आणि पाय धुवून जेवायला बसायचं.

आजी अत्यंत मितभाषी होत्या. मिटल्या तोंडी त्यांची सगळी कामं चालू असत. देव देवतार्चन, नैवेद्य, वैश्वदेव हे सगळं नानांच्या आज्ञेनुसार चालत असे. काळानुरूप त्या पुरूषप्रधान संस्कृती मानणाऱ्या होत्या असंच म्हणावं लागेल. काही चुकलं तर त्यांचे डोळे अतिशय कठोर होत, तर कधी इतक्या मिश्किल हसत की मी विचारात पडत असे, काय झालं बुवा ?. मला आठवतं, कशावर तरी झाकण ठेवलेलं ताट रोज माझ्याच वाट्याला येत असे. माझ्या भावाला असं ताट कधीच ठेवलं जात नसे. एकदा मी त्याबद्दल माझ्या आईजवळ तक्रार केली. आईने आजींना ''तिला हे ताट देऊ नकोस'' असं सांगितल्यावर, ''बरं हो,'' असं म्हणत त्या खुदकन हसलेल्या मला आजही आठवतात. असं खरकटं ताट माझ्या वाट्याला येणं बंद झालं, पण ते माझ्या भावालाही ठेवलं जात नसे, ते त्या स्वत: घेत किंवा आई मावशी ह्यांना ठेवलं जाई. त्यांच्या लेखी मुलीची जात, बाईचं वागणं ह्याला फारच मर्यादा होत्या. त्या लक्ष्मणरेषेपलीकडे



जाणं त्यांना मान्य नसे. पण तरीही आज मी या वयात आल्यावर त्यांचं वागणं आता काही बाबतीत अनुकरणीय वाटतं.

बाईनं कसं वागावं ? ह्याचं त्या मूर्तिमंत प्रतीक होत्या असं म्हणायला हरकत नाही. माझ्या आजोबांसमोर/नानांसमोर त्यांचं कधीच काही चाललं नाही. पण म्हणून त्या निर्णयक्षम नव्हत्या असं म्हणता येणार नाही. त्या कुणावरही मानसिक आणि बौध्दिकदृष्ट्या अवलंबून नव्हत्या. शेवटी काही वर्ष ते पुण्यात रहात होते. नोकरी निमित्त मामा मामींना तिकडे जाणं शक्य नाही आणि त्यांना मुंबईत येऊन राहणं शक्य नव्हतं. नानाच्या पश्चातही पुण्याच्या घरात त्या एकट्या राहिल्या. त्यांना सगळ्यांनी सांगितलं, ''एकट्या कशा रहाल ? त्यापेक्षा मुंबईला या''. पण त्यांचं म्हणणं एकच, ''मी मुंबईला येऊन राहिले की, मला काहीही काम नाही आणि मग मी परावलंबी होईन''. दुर्दैवाने मजल्यावरची बाकीची तीन घरं सुध्दा बंद असत. एकट्या रहात होत्या म्हणून त्यांनी कधी कसला कंटाळा केल्याचं आठवत नाही. त्या अगदी सगळं पूर्वीप्रमाणे करत. आजींना काय नको ते सगळं पहायला मामा दर आठवड्याला एक फेरी मारत असे. ढकलगाडी घेऊन येणाऱ्या भाजीवाल्या -कडून दोरीला पिशवी, पिशवीत पैसे घालून खाली सोडत. विहिरीतून पाणी काढावे तशी भाजी वर खेचून घेत. रोज लख्ख घासून देव पूजा करत. नैवेद्यही दाखवत. एका छोट्याशा झाकणीत सगळं वाढून कावळ्याला घास ठेवत. स्वत:ची सगळी कामं करण्यात त्यांचा दुपारपर्यंत वेळ जात असे. घरातून मुख्य रस्त्यावरची रहदारी दिसत असे, तो त्यांचा विरंगुळा.

शेवट शेवट एकदा आजारी पडल्या (mild heart attack) तेव्हा घरात एकट्याच होत्या. घरात अजून फोन बसवला गेला नव्हता. काहीतरी वेगळे होतंय, हे जाणवल्या बरोबर टेलीफोनची डायरी हातात धरून दार उघडं ठेवून दारासमोरच्या सेठीवर

## व्हॅ'नीला'

बसल्या. साडेसात आठ वाजता लहान मुलं खेळून वर जाऊ लागली. त्यातल्या एकाला बोलावून त्याच्या आईला निरोप पाठवला. केवढं प्रसंगावधान? कुठचीही भीती नसेल वाटली? जीव कासावीस होतोय तरी कोणत्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा नाही, आपल्या आवाक्या बाहेरची कोणतीही कृती नाही. न टाळता येणाऱ्या घटना अत्यंत प्रगल्भपणे स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी नि:संशय वंदनीय आणि अर्थात अनुकरणीय! खरं तर आताच्या काळात अत्यंत दुर्मिळ...

ह्या गोष्टीला किमान १८ ते २० वर्ष झाली. संपर्कासाठी दूरध्वनी शिवाय दुसरं माध्यम नाही. आजच्या सारखा संगणक नाही, २४ तास सुरू असणाऱ्या चित्रवाणी मालिका नाहीत. Mobile, Whats app नाही. रात्री सोबतीला एक मुलगी येत असे, त्याव्यतिरिक्त दिवसभर घरात कोणीही नाही. तरीही त्या त्यांच्या विश्वात सुखी होत्या. आणि समजा नसल्या, असली काही खंत, तरी न बोलता एकटीनं राहण्याचा धीरोदात्तपणा त्यांच्याकडे होता. कदाचित बोलायला कुणीच नाही त्यामुळे स्वत:चा स्वत:शीच संवाद झाला असेल कां ? आपल्या आजुबाजूची परिस्थिती कायम आहे तशीच राहणार नाहीये, त्यात होणाऱ्या बदलांना सामोरं जाण्याची, हे बदल अत्यंत प्रगल्भपणे स्वीकारण्याची मानसिक तयारी यामुळे झाली, असंच म्हणावं लागेल. जे सुरळीत सुरू आहे ते कधीतरी बिनसणार आणि बिनसलेलं पुन्हा सुरळीत होणार यावर त्यांचा ठाम विश्वास असावा. या विश्वासाच्या जोरावरच त्यांचं एकटं रहाणं त्या सहज निभावू शकल्या.

आयुष्यभर त्यांनी जी तपश्चर्या केली त्याचे फळ म्हणून आपलं स्वावलंबन, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य वयाच्या ८५व्या वर्षीसुध्दा त्या टिकवून ठेवू शकल्या. आयुष्याच्या तिन्हीसांजेला उपयोगी पडणारी हीच खरी संपत्ती नाही कां?




**-नीला वैशंपायन**
9920329214
wneela2gmail.com


The END

कथापूर्ती

# धडा

*(स्वयम् फेब्रुवारीच्या अंकात दिलेल्या कथेचा शेवट)*

आम्ही दोघे चर्चगेटला उतरल्यावर तो त्याच्या ऑफिसच्या दिशेने गेला आणि मी अगदी विरुध्द दिशेने......मनात आलं, कसं असतं ना, गाडीत जसे आम्ही अगदी विरुध्द विचारांचे प्रवासी होतो तशाच आत्तासुध्दा आमच्या वाटा भिन्न आहेत. त्याला त्याच्या वागणूकीबद्दल कसा धडा शिकवायचा हा विचार मनातून काही केल्या जात नव्हता. मी मनाच्या त्या अस्वस्थेतच कसं तरी माझं काम आटोपलं आणि घरी आलो. चेहऱ्यावरची अस्वस्थता बायकोनं ताबडतोब वाचली. चहाचं आधण टाकीत म्हणाली,

''काय, काम झालं नाही कां?''

''नाही, नाही .. झालं ना काम...''

तिनं पुढं काही विचारू नये म्हणून मी घाईघाईत पटकन म्हणालो.

''मग गाडीला गर्दी होती म्हणून बसायला नाही का मिळालं?''

जिची प्रश्नावली संपेल तर ती बायको कसली? मीच टिपॉयवरचा पेपर उचलित तिथून पळ काढीत तिला म्हटलं,

''पेपर वाचायचा राहिलाय. चाळतो जरा आडवारून''

''आता कसल्या पेपरातल्या शिळ्या बातम्या वाचताय? आणि शिवाय बातम्याचे अे टू झेड चॅनेल्स सर्फिंग करालच ना?''

बायकोच्या पुढल्या संभाव्य प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत कानावर आलेला प्रश्न न ऐकल्यासारखा करीत मी म्हटलं,

''आज मी वॉकला मात्र नाही येत. तू जा हो. ..नाहीतरी तुझ्या सख्या म्हणतातच ना..कधी तरी विठोबा रखमाईनी वेगळ्या वेगळ्या वाटेने जावे म्हणून....''

बायको लटका कटाक्ष टाकीत वॉकला निघून गेली. मी बॅगेतून कार्ड काढलं. या सुविद्य माणसाला त्याच्या बेजबाबदार वागण्याबद्दल कसा धडा शिकवावा याचा विचार सुचावा म्हणून मी बायकोनं दिलेला चहा पुन्हा एकदा सणसणीत गरम करून घेतला. आणि खरंच, बायकोनं प्रेमानं दिलेल्या चहाचा इफेक्ट असेल किंवा त्या सद्गृहस्थाला (?) धडा शिकवण्यासाठी सळसळणाऱ्या माझ्या रक्तामुळे असेल... पण मी मनातल्या मनात युरेका युरेका म्हणून ओरडलो. आणि कामाला लागलो.

घरातल्या जुन्या रिसिट्स, जुने रिपोर्टस्, जुनी औषधाची बिलं काढून भराभर त्याचे तुकडे केले....जसे त्या भल्या गृहस्थानं केले होते ना, अगदी तसे...ते एक मोठ्या कागदी पिशवीत भरले आणि सुवाच्य अक्षरात पत्र लिहायला घेतलं.

श्री सो ॲन्ड सो,

तुम्हाला आठवतंय, दोन दिवसांपूर्वी आपण आपल्या देशातल्या पश्चिम रेल्वेच्या लोकल गाडीतून काही कामासाठी चर्चगेटला जात होतात. आपल्या कार्यबाहुल्यामुळे आपल्याला बॅग आपल्या घरी स्वच्छ करणं म्हणजे नको असलेले कागद फाडून टाकणं कदाचित शक्य होत नसेल. म्हणून आपण गाडीतला प्रवासाचा वेळ सत्कर्मी लागावा म्हणून त्या वेळेत आपली बॅग साफ करण्याचे महान कार्य सुरू केलेत आणि त्यातून तयार होणारा कचरा कोणतीही भाडभीड न बाळगता डब्यात टाकत गेलात. बघता बघता तुमची बॅग 'कचरा निर्मुलित' झाली. लहानपणी शिकवलेलं नागरिक शास्त्र तुमच्या इतकं विस्मरणात गेलं की तो कचरा गोळा करून योग्य ठिकाणी टाकावा असा विचारसुध्दा तुमच्या मनाला शिवला नाही, हे, मी तुमचा चेहरा न्याहाळताना मला जाणवत होतं. परत असं तुमच्या हातून घडणार नाही या हेतूने हे पत्र आणि सोबत तुमचा कचरा सुध्दा....

आपला स्नेहांकित,

अेक्स. वाय. झेड.

आणि कचऱ्याच्या पिशवीचं मस्त आकर्षक पार्सल तयार केलं. पार्सलवर सुवाच्य अक्षरात त्याचा कार्डवरचा पत्ता लिहिला आणि डावीकडल्या कोपऱ्यात लिहिले,

फ्रॉम :

व्यवस्थापक,

पश्चिम रेल्वे, चर्चगेट,

मुंबई ४००००१

पार्सल कुरिअर करून घाईघाईने घरातला पसारा आवरला. 'कपाटं आवरा....कपाटं आवरा...' असं तोंडाच्या कण्या होईपर्यंत सांगून सुध्दा दाद न देणाऱ्या आपल्या नवऱ्यानं, आज इतकं दमून येऊन सुध्दा कपाटं आवरून ती साफ करण्याचं काम कसं केलं, हा बायकोच्या चेहऱ्यावरचा प्रश्न वाचून उत्तर द्यायला नको म्हणून ''मी डोकं दुखतंय म्हणून जेवायला नको'' सांगून पांघरूण घेऊन झोपून गेलो.




**सौ. स्वाती लोंढे**
प्रभादेवी, मुंबई ४०००२५
फोन : ९८६९४४९२०९


श्री. गिरीश भागवत (आ.स.क्र. ४११३) यांनीही कथापूर्ती केली होती. त्यांचे आभार.

(मुखपृष्ठ २ वरुन पुढे →)

**निजवते भूक्या पोटी**
**तिला रात म्हणू नही**
**अखडला दानासाठी**
**त्याले हात म्हणू नही**

**जिला नाही फुटे पान्हा**
**तिला माय म्हणू नही**

धरणी, वारा, आभाळ, पाऊस, ऊन यांच्या आधाराने वाढलेली बी बियाणे, मोट, नाडा, शेत, खळे, बैल, नागर, वाखर, बौरी, बाभळी, निंबोणी, चुल, तवा, भाकरी, भाजी, विस्तव, फुंकणी, पाखरे, झाडे, वेली, देव, दैव या साऱ्याशी रक्ताच्या हाडामासांनी एकरूप झालेल्या त्यांच्याशी नात्याने बांधलेल्या या ओव्या गीत अस्सल देशी आहे आणि हेच लोक साहित्य म्हणून लोकांना आजही २१ व्या शतकातही मनाला भुरळ घालतात. फुंकणी, चुल, जातं, घरोटा हे शब्द आज दैनदिन जीवनात ऐकायलाही मिळत नाहीत पण एकेकाळी हेच जीवन होतं आणि ते बहिणाईनी आपल्या काव्यात साध्या सोप्या शब्दात प्रकट केले.

त्यांनी या साऱ्यावर मनापासून प्रेम केलं. लिंबाच्या झाडाला त्या निंबाजीबुवा म्हणत तर गुलमोहराच्या झाडाला फुलोजी महाराज म्हणत. धड आलेल्या केळीला त्या लेकुरवाळी रंभा म्हणत. त्यांच्या प्रवृत्तीत माऊलीची माया होती ती त्यांच्या शब्दातून जागोजागी व्यक्त झालेली दिसते....



**धरतीच्या कुशीमधी**
**बीयाबियाणं निजली**
**वऱ्हे पसरली माटी**
**जशी शाल पांघरली**

बी जेव्हा मातीत पेरलं जातं तेव्हा ते मातीत खाली जातात आणि वर माती असते. त्यांच्यातील माय इथे बोलते. त्यांना असे वाटते की ही माती म्हणजे शाल या बीयांनी पांघरली. अशी कल्पना फक्त बहिणाईच करू जाणे. अत्यंत वात्सल्य, ममता त्यांच्या ओठात आणि पोटातही होती म्हणून त्यांना हे बीयाणाचे वेगळे रुप दिसले.

त्या एक वात्सल्यमूर्ती होत्या. त्यांची गाणी विविध विषयावर आहेत. बहिणाई सरस्वतीलाही माय म्हणतात. आई या नागरी शब्दापेक्षा बोली भाषेतला माय हा शब्द किती मृदू आहे. या शब्दात जो भावार्थ ओथांबलेला आहे, तो त्या स्पष्ट करतात....

**माय म्हणता म्हणता**
**होट होटालागे भिडे**
**आत्या म्हणता म्हणता**
**केवढे अंतर पडे**
**माय म्हटली म्हटली**
**जशी तोंडातली साय**

माय शब्दातून व्यक्त होणारी भावनीक जवळीक 'साय' या शब्दातून आईच्या मनाचा मृदूपणा हे सहज लक्षात येतं....

**ताता म्हणता म्हणता**
**दातामधे जीभ अडे**
**काका म्हणता म्हणता**
**कशी माघे माघे दडे**

**जी जी म्हणता म्हणता**
**झाला जीभेला निवारा**
**सासू म्हणता म्हणता**
**गेला तोंडातून वारा**

**मानसा मानसा**
**कधी व्हशील माणूस**
**लोभासाठी झाला**
**मानसाचा रे काणुस**

हे वाचलं की वाटतं माणूस देव न होवो पण तो माणूस कधी होईल काणूस म्हणजे ना माणूस ना पशू अशी त्याची अवस्था झाली आहे.

आतापर्यंत आपण पाहिलं बहिणाईने माहेरच्या ओव्या आणि गाणी खूप लिहिली. माहेर विषयीही श्रध्दा प्रेम फार आहे. पण माहेर माहेर करणाऱ्या स्त्रीला योगी एका ठिकाणी विचारतो.....

**योगी**
**माझं माहेर माहेर**
**सदा गानं तुझ्या ओटी**
**मंग माहेरून आली**
**सासराले कशासाठी**

**सासुरवाशीण**
**अरे लागले डोहाये**
**सांगे शेतातली माटी**
**गाते माहेराचं गाणं**
**लेक येईन रे पोटी**

**दे रे दे रे योग्या ध्यान**
**ऐक काय सांगते मी**
**लेकीच्या माहेरसाठी**
**माय सासरी नांदते**

सुनेचं सासर हे तिच्या मुलीचं माहेर आहे. म्हणून मुलीच्या माहेरासाठी सासरी नांदावं लागतं हे बहिणाईची जाणीव निरिक्षण हे सूक्ष्म आहे. त्यांचं काव्य हे भावकाव्य आहे. त्यांची भाषाशैली मनोवेधक आहेत. त्यांची गाणी प्रासादिक आहेत. श्रवण मधूर आहेत. त्यांच्या गाण्यात उतणं, मातणं नाही, दु:ख आहे. पण आक्रोशही नाही, तत्वज्ञान आहे. पण तत्वज्ञानाचा रुक्षपणा नाही. उपदेश आहे, पण उपदेशाचा कोरडेपणा नाही. कल्पनाविलास आहे, पण त्यात कृत्रिमता नाही. मरणाबद्दल सुध्दा किती सहज बोलतात....

**आला सास गेला सास**
**जीवा तुझं रे तंतर**
**अरे जगनं मरनं**
**एका सासाचं अंतर**

अनेक कष्ट करत जीवन त्यांनी जवळून पाहिलं. तसंच मरण पण त्यांनी सहज स्वीकारले.

मनाबद्दल बोलताना त्यांनी नेमक्या शब्दात मनाचे चंचलपण मांडले आहे....



**मन पाखरू पाखरू**
**त्याची काय सांगू मात**
**आता व्हतं भुईवर**
**गेलं गेलं आभायात**

**मन जहरी जहरी**
**यांच न्यारं रे तंतर**
**अरे इंचू साप बरा**
**त्याले उतारे मंतर**

इथेच त्या थांबत नाहीत तर त्या देवाला विचारतात ....

**देवा असं कसं मन**
**असं कसं रे घडलं**
**कुठे जागेपणी तुले**
**असं स्वप्न पडलं**

मनाबद्दल भल्या भल्या कवी पंडिताना सुध्दा कळले नाही ते त्यांनी नेमक्या शब्दात मांडले आहे.

(८ मार्च ह्या जागतिक महिलादिनी बहिणाईचं स्मरण करु या)



**सौ. मीनल वसमतकर**
**9867020190**

# आनंदाश्रम - १०व्या वर्धापनदिनाची क्षणचित्रे











हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. पाईपलाईन, अंधेरी पूर्व येथे छापून ब्राह्मण सेवा मंडळ, भवानीशंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.